


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ३८ * नांदेड * सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## मिनी विधानसभेवर कोणाचं राज्य? राज्यातील १२ जिल्हा परिषदांचा आज निकाल

**मुंबई (प्रतिनिधी)–** पुणे, सोलापूरसह महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी सरासरी ६८ टक्के मतदान पार पडले आहे. या निवडणुकीत एकूण ७,४३८ उमेदवारांचे राजकीय भवितव्य आता मतदानयंत्रात बंद झाले. आज सोमवारी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.



सोमवारी सकाळी १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुकींचा निकाल जाहीर होणार आहे. ५० टक्के आरक्षणाच्यामर्यादेत या निवडणुका पार पडल्या असून अनेक ठिकाणी शांततेत तर काही ठिकाणी किरकोळ तणावात मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. या निकालातून स्थानिक राजकारणाचे चित्र स्पष्ट होणार आहे. मतदानाची ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष सोमवारी लागणाऱ्या निकालाकडे लागले आहे. प्रशासनाने निकालाची तयारी पूर्ण केली असून, दुपारपर्यंत चित्र स्पष्ट होईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत मतदारांनी कोणाला कौल दिला आहे, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## मुंबईत परदेशी शिक्षणाच्या नावाखाली कोट्यवधींची फसवणूक

**मुंबई (प्रतिनिधी) –** मुंबईत परदेशी शिक्षणाच्या नावाखाली कोट्यवधींची फसवणूक झाल्याच्या एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. परदेशात उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पाठवणाऱ्या एका एजन्सीने डिसेंबर महिन्यात पालक आणि विद्यार्थ्यांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचं प्रकरण समोरं आलं आहे. चारकोप परिसरातील करिअर अँड ऑप्शन्स सर्व्हिस लिमिटेड या एजन्सीविरोधात चारकोप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यां प्रकरणात एजेन्सीचे मालक स्टेला मेहता आणि राकेश मेहता हे मुख्य आरोपी आहेत.

## भाजपमुळे संघाला नव्हे तर संघामुळे भाजपला 'अच्छे दिन'- सरसंघचालक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्ष पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त आरएसएसकडून विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे. मुंबईतील वरळी डोममध्ये संघाचे मनोमिलन सुरू आहे. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित आहेत.

या कार्यक्रमात बोलताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी विविध मुद्द्यांवर आपले विचार मांडले आहेत. भाजप सत्तेत आल्यामुळे संघाचे चांगले दिवस सुरु झाले आहेत का? असा प्रश्न त्यांना यावेळी विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देताना मोहन भागवत म्हणाले की, भाजप सत्तेत आल्याने संघांचे चांगले दिवस आले का



तर हे उलट आहे. आमच्या मेहनतीमुळे भाजपचे चांगले दिवस सुरु झाले, असे यावेळी मोहन भागवत यांनी म्हटलं आहे.

आम्ही अयोध्या, राम जन्मभूमी आंदोलन सुरु केलं. लोक जोडली गेली. लोकांना आमची भूमिका पटली. लोकांपर्यंत पोहचणे आणि त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करणं हे आमचं काम आहे. असं यावेळी मोहन भागवत यांनी म्हटलं आहे.

आमची शक्ती आहे, लोक आमचं ऐकत असतील तर त्यांचा फायदा होतो. त्यांनी आमची साथ दिली म्हणून त्यांना चांगले दिवस आले. आम्ही भाजपवर कोणताही दबाव टाकला नाही. आमच्या संघाच्या शाखेत कोणतेही राजकारण होत नाही. आम्हाला कुणी सल्ला मागितला तर सर्वांना मिळणार त्यांचं पुण्य त्यांच्याकडे, त्यांचं पाप थोडं आमच्याकडे, कारण ते आमच्याकडून गेले आहेत. राजकारणात कुणाचाही दबाव नसतो. असेल तर तो मतदारांचा असतो, असेही यावेळी मोहन भागवत यांनी म्हटले आहे.

## सोलापूरच्या मोहोळमध्ये चक्क ढाब्यावर आढळल्या ईव्हीएम मशीन

**सोलापूर (प्रतिनिधी) –** सोलापूरच्या मोहोळमध्ये ईव्हीएम मशीन चक्क धाब्यावर (हॉटेल) आढळून आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काही लोक या ईव्हीएम मशीन घेऊन जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उमेश पाटील यांनी केला आहे. दरम्यान हा प्रकार उघडकीस आल्यानंतर प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मोहोळ शहरानजीक असलेल्या हॉटेल स्वराज्य येथे या ईव्हीएममशीन घेऊन जाताना पकडल्याचा दावा करण्यात येतोय. दरम्यान यावेळी २ सीलबंद EVM मशीन देखील आढळून आल्याची माहिती आहे.

मोहोळ मतदारसंघात जिल्हा परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना मध्यरात्रीच्या सुमारास एक वेगळाच प्रकार घडला आहे. मोहोळ शहराजवळील एका हॉटेल आणि बारच्या परिसरात ईव्हीएम मशीन आढळून आल्याने लोकशाहीच्या या उत्सवात खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उमेश पाटील यांनी हा प्रकार उघडकीस आणला असून त्यांनी या संबंधित व्यक्तींना जाब विचारलाय. घटनेची माहिती मिळताच निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सीमा होळकर आणि पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे हे देखील घटनास्थळी दाखल झालेत. दरम्यान, याबाबत प्रशासनाला विचारले असता, या मशीन्स 'राखीव' स्वरूपातील होत्या असं स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. मात्र उमेश पाटील यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून, मतदानाच्या प्रक्रियेत पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

दरम्यान मोहोळचे तहसीलदार आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन मुळीक यांच्या माहितीनुसार 'लोकांनी अडवलेल्या मशीन ह्या राखीव मशीन आहेत. त्यांचा वापर मतदानासाठी झालेला नाही. अद्यापही या मशीन सिलबंद स्वरूपातच आहेत. मतदान झालेल्या सर्व मशीन रात्री १०.३० पर्यंत स्ट्राँग रूममध्ये जमा करून स्ट्राँग रूम सील करण्यात आली.' अशी माहिती मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांनी दिली.

## पाच राज्यांच्या निवडणुकीचा बिगुल मार्चमध्ये वाजणार; अंतिम मतदार यादींची तारीख जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी) –** आसाम, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांच्या तारखा मार्चच्या पहिल्या आठवड्यात जाहीर केल्या जाऊ शकतात. २०२१ मध्ये या राज्यांमधील विधानसभा निवडणुका एकाच वेळी झाल्या आणि २६ फेब्रुवारी रोजी तारखा जाहीर करण्यात आल्या होत्या.

यावेळी, या राज्यांमध्ये मतदार याद्यांच्या पडताळणीमुळे निवडणुकीच्या तारखा लांबण्याची शक्यता आहे. दरम्यान, निवडणूक तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोग १५ फेब्रुवारीनंतर आपला दौरा सुरु करू शकतो. आयोगाने आपल्या भेटीपूर्वी जमिनीवरील तयारीचा आढावा घेण्यासाठी या राज्यांमध्ये आपले कनिष्ठ दर्जाचे अधिकारी पाठवण्यास सुरुवात केली आहे

आयोगाची एक टीम आसाममध्ये पोहोचली आहे आणि लवकरच इतर राज्यांसाठी पथके रवाना होतील. निवडणुकीच्या तयारीचा एक भाग म्हणून, आयोगाने अलीकडेच पाच राज्यांमध्ये तैनात करण्यात येणाऱ्या निरीक्षकांसोबत बैठका घेतल्या. तैनात करताना घ्यावयाच्या खबरदारीची माहितीही त्यांनी दिली.

आयोगाच्या मते, आसामची अंतिम मतदार यादी १० फेब्रुवारी रोजी प्रकाशित केली जाईल, तर बंगाल, केरळ आणि पुद्दुचेरीची मतदार यादी १४ फेब्रुवारी रोजी आणि तामिळनाडूची मतदार यादी १७ फेब्रुवारी रोजी प्रकाशित केली जाईल. याचा अर्थ असा की त्यानंतरच आयोग या राज्यांमधील निवडणूकतयारीचा आढावा घेण्यास सुरुवात करेल. मार्चमध्ये जाहीर होणाऱ्या वा पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुका राजकीयदृष्ट्याही महत्त्वाच्या आहेत, कारण सध्या पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि केरळमध्ये विरोधी पक्षांची सत्ता आहे, तर आसाम आणि पुद्दुचेरीमध्ये एनडीए सरकार सत्तेत आहे.



बिहारनंतर देशभरातील १२ राज्यांमध्ये मतदार यादीची विशेष पडताळणी केल्यानंतर, निवडणूक आता महाराष्ट्र, झारखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू आणि काश्मीरसह या सर्व राज्यांमध्ये लवकरच एसआयआर सुरु करण्याची तयारी करत आहे. मार्चमध्ये याची घोषणा होण्याची अपेक्षा आहे. आयोगाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उर्वरित काम प्रलंबित असलेल्या सर्व राज्यांमध्ये एसआयआरचे काम एकाच वेळी केले जाईल. दरवर्षी मे महिन्याच्या अखेरीस ते पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.

## कलबुर्गीहून बेळगावला जाणारं विमान विजयपूरच्या शेतात कोसळलं, तांत्रिक बिघाड झाल्याची शक्यता



**बेळगाव (प्रतिनिधी) –** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाती निधनाची बातमी ताजी असतानाच कर्नाटकातील विजयपूर येथे आणखी एका विमानाचा अपघात झाला आहे. कलबुर्गीवरून बेळगावला जाणारं एक खासगी विमान विजयपूरमधील बबलेश्वर तालुक्यातील मंगळूर गावात कोसळलं. या अपघातात दोन जण जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या वृत्तानुसार, कोसळलेले विमान हे रेड बर्ड कंपनीचे एक खासगी प्रशिक्षण विमान असल्याची माहिती आहे. या अपघाताची माहिती मिळताच, पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले. ही घटना बबलेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

अपघातग्रस्त विमान हे विमान कलबुर्गीहून बेळगावला जात होतं. उड्डाण केल्यानंतर या विमानात काही तांत्रिक बिघाड निर्माण झाला किंवा इंधन संपल आणि हे विमान खाली कोसळल्याचे सांगण्यात येत आहे. विजयपूर जिल्ह्यातील बबलेश्वर जवळ असलेल्या मंगळूरू गावाच्या परिसरातील एका शेतात हे विमान जमिनीवर कोसळलं. सुदैवाने या विमानातील प्रशिक्षक आणि प्रशिक्षणार्थी हे अपघातात बचावले आहेत. या अपघातात सहाय्यक फ्लाइट इन्स्ट्रक्टर कॅप्टन कुणाल मल्होत्रा आणि प्रशिक्षणार्थी वैमानिक गौतम संकर हे दोघे जखमी झाले आहेत. त्यांना अधिक उपचारांसाठी बीएलडीई रुग्णालय येथे दाखल करण्यात आले आहे.

वैमानिक प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या रेड बर्ड एव्हिएशन संस्थेचे हे प्रशिक्षण विमान कलबुर्गीहून बेळगावकडे जात असताना अपघातग्रस्त झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतीस धाव घेत जखमींना रुग्णवाहिकेतून रुग्णालयात पोहोचवले. सध्या दोघांवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. या विमान अपघाताची माहिती मिळाल्यांतर, ते पाहण्यासाठी गावकऱ्यांनी या ठिकाणी मोठी गर्दी केल्याचं दिसून आलं.

## परीक्षा केंद्रावर महिलांना मंगळसूत्र काढण्यास सांगितले; मुख्यमंत्र्यांकडून चौकशीचे आदेश

**मुंबई (प्रतिनिधी) –** महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातून एक अतिशय गंभीर घटना समोर आली आहे. जिथे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा दरम्यान महिलांना त्यांचे मंगळसूत्र काढण्यास भाग पाडण्यात आले. ही घटना उघडकीस आल्यानंतर वाद वाढला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही विधान समोर आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याची घोषणा केली आहे.

प्रत्यक्षात अहिल्यानगरमधील संभाजीनगरमध्ये CTET परीक्षेदरम्यान, परीक्षा केंद्रात प्रवेश करताना महिलांना त्यांचे मंगळसूत्र काढण्यास भाग पाडण्यात आल्याची घटना समोर आली आहे. यावर प्रतिक्रिया देताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल असे म्हटले आहे.



**नांदेड –** येथे हिमवत केदार जगद्गुरु श्री श्री श्री १००८ भीमाशंकरलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांचा पट्टाभिषेक रजत महोत्सव आणि विश्वशांती महायज्ञ सोहळ्यात वैराग्य सिंहासनाधिश्वर केदार जगद्गुरु भिमाशंकर लिंग शिवाचार्य यांच्या सानिध्यात प्रयाग येथील कथा वाचक शिवमजी शुक्ला आणि माता कन्यकेश्वरी यांच्या कथेत भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. **(छायाचित्र : विजय होकर्णे)**

## नेपाळने शेवटपर्यंत इंग्रजांना नाचवलं, टी-२० वर्ल्ड कपचा सर्वात धक्कादायक उलटफेर टळला

**कोलंबो –** टी-२० वर्ल्डकप २०२६ मधील पाचव्या सामन्यात मुंबईच्या ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर इंग्लंड आणि नेपाल आमनेसामने होते. या सामन्यात मोठा उलटफेर होण्याची शक्यता निर्माण झाली होती, पण अखेर इंग्लंडने अनुभवाच्या जोरावर सामना आपल्या बाजूने वळवला आणि अवघ्या ४ धावांनी रोमांचक विजय मिळवला. सामन्याच्या एका टप्प्यावर नेपाल सहजपणे इंग्लंडला पराभूत करेल असे चित्र दिसत होते. मात्र, निर्णायक क्षणी इंग्लिश खेळाडूंनी जबरदस्त पुनरागमन करत सामन्यावर पकड मिळवली.

सामन्याच्या शेवटच्या षटकात नेपालला विजयासाठी १० धावा हव्या होत्या. त्या निर्णायक क्षणी सॅम करणने अचूक यॉर्कर टाकत केवळ ५ धावा दिल्या आणि इंग्लंडच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. या कामगिरीमुळे सॅम करण सामन्याचा खरा हिरो ठरला. नेपालकडून दीपेंद्रसिंह ऐरी आणि लोकश बाम यांनी झुंजार फलंदाजी केली, मात्र त्यांची मेहनत अपुरी ठरली.

## एसटीच्या नव्या बसेसचे नामकरण 'राजमाता जिजाऊ'; परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांची माहिती

**मुंबई (प्रतिनिधी) –** महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बसेस दाखल होत आहेत. गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ३ बाय २ आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी अत्याधुनिक बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बसेसना 'हिंदवी स्वराज्याची जननी असलेल्या राजमाता जिजाऊ' यांचे नाव देण्यात आले असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.



या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बसेस महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे जणू चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत.

मंत्री सरनाईक म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्या स्वराज्य संकल्पनेमागे उभी राहिलेली प्रेरणाशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ साहेब! त्या अर्थाने त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी ठरतात. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ एसटीच्या नवीन बसेसचे राजमाता जिजाऊ असे नामकरण केले आहे. अर्थात, एसटीने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नावांनी बसेसना यापूर्वी गौरवले आहे. आता त्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.


सध्याच्या बसेसची आसन क्षमता साधारण ४० प्रवासी इतकी असताना, नव्या बसेसमध्ये ५५ प्रवासी आरामात बसू शकतील. म्हणजेच गर्दीच्या मार्गांवर उभे राहणाऱ्या तब्बल १५ प्रवाशांना आता बसण्याची सोय उपलब्ध होणार आहे.

त्यामुळे ही सेवा विशेषतः दोन शहरांदरम्यानच्या अतिगर्दीच्या मार्गांवर सुरू करण्याचा एसटीचा मानस आहे, असे मंत्री सरनाईक म्हणाले 'राजमाता जिजाऊ' हे नाव केवळ नामकरण नाही, तर स्वराज्याच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीच्या बांधिलकीचे एक सन्मानचिन्ह आहे. लवकरच इतिहासाच्या साक्षीने सजलेल्या या बसेस आधुनिक सुविधांसह महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावतील असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.




## नक्षलवादाचा ३१ मार्चपर्यंत पूर्ण नायनाट केला जाईल; गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला विश्वास

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** केंद्र सरकारच्या सुरक्षा-केंद्रित रणनीतीमुळे आणि पायाभूत सुविधांच्या विकासामुळे डाव्य उग्रवादाविरोधातील लढाई निर्णायक टप्प्यावर पोहोचली असून, येत्या ३१ मार्चपूर्वी नक्षलवादाचा पूर्णपणे बिमोड केला जाईल, असा ठाम विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी येथे व्यक्त केला.



छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे आयोजित एका उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठकीनंतर ते बोलत होते. नक्षलवाद संपवण्यासाठी केंद्र सरकारने निश्चित केलेल्या ३१ मार्चच्या डेडलाईनच्या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीत छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय, गृहराज्यमंत्री विजय शर्मा यांच्यासह केंद्रीय गृहसचिव, गुप्तचर विभागाचे संचालक आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

याशिवाय नक्षलवाद प्रभावित महाराष्ट्र, ओडिसा झारखंड आणि तेलंगणा या राज्यांचे पोलीस महासंचालक आणि सीआरपीएफ, बीएसएफ, आयटीबीपी सारख्या निमत्रष्करी दलांच्या प्रमुखांनीही या चर्चेत सहभाग घेतला होता. नक्षलवाद्यांचे आर्थिक जाळे उद्ध्वस्त करणे आणि त्यांच्या शरण येण्याच्या धोरणाला प्रोत्साहन दिल्याने नक्षलवादी चळवळ आता बॅकफूटवर आली असल्याचे शाह यांनी यावेळी नमूद केले

छत्तीसगडचा बस्तर विभाग हा दीर्घकाळापासून नक्षलवाद्यांचा बालेकिल्ला समजला जात होता. मात्र, गेल्या काही वर्षात राबवलेल्या आक्रमक मोहिमांमुळे ही पकड सैल झाली आहे. गेल्या वर्षभरात सुरक्षारक्षकांनी मोठी कामगिरी बजावली असून, जानेवारी २०२४ पासून आतापर्यंत ५०० हून अधिक नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले आहे. यामध्ये नक्षलवाद्यांचा म्होरक्या बसवराजू याच्यासारख्या जहाल नक्षलवाद्यांचा समावेश आहे. याच काळात सुमारे १,९०० नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली असून २,५०० पेक्षा जास्त जणांनी हिंसेचा मार्ग सोडून आत्मसमर्पण केले आहे. ही आकडेवारी नक्षलवादाच्या अंताची स्पष्ट साक्ष देत असून, आता हा लढा अंतिम टप्प्यात असल्याचे गृहमंत्र्यांनी स्पष्ट केले

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकल जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# बलुचिस्तान संघर्ष नैसर्गिकच

गेल्या सात दशकांहून अधिक काळ बलुचिस्तानचा प्रश्न पाकिस्तानच्या राजकीय आणि लष्करी व्यवस्थेसाठी डोकेदुखी ठरलेला आहे. मात्र अलीकडच्या काळात या संघर्षाने अधिकच उग्र आणि धोकादायक वळण घेतले आहे. पाकिस्तानच्या सर्वात मोठ्या, पण राजकीयदृष्ट्या सर्वाधिक दुर्लक्षित प्रांतातील असंतोष आता केवळ बंदुका आणि बॉम्बपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर त्यात महिलांचा थेट सहभाग दिसू लागला आहे. हे चित्र पाकिस्तानसाठी केवळ सुरक्षेचे नव्हे, तर अस्तित्त्वाचेही आव्हान बनत आहे. पाकिस्तानी लष्कर आणि बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) यांच्यात सुरू असलेल्या चकमकींनी संघर्षाची तीव्रता स्पष्ट होते. 'ऑपरेशन हेरॉ'च्या दुसऱ्या टप्प्यात बीएलएने एकाच वेळी दोन शहरांमध्ये मोठे हल्ले केल्याचा दावा केला आहे. या हल्ल्यांत पाकिस्तानी लष्कर, पोलीस आणि फ्रंटियर कोअरच्या २०० हून अधिक जवानांना ठार मारल्याचा आणि १७ जणांना ताब्यात घेतल्याचा बीएलएचा दावा आहे. दुसरीकडे पाकिस्तानी प्रशासनानेही प्रत्युत्तरादाखल सुमारे ७० बंडखोरांना ठार केल्याचे सांगितले आहे. मात्र या परस्परविरोधी दाव्यांपलीकडे वास्तव असे की, हा संघर्ष आता नियंत्रणाबाहेर जात असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. या संघर्षातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे बीएलएने प्रथमच महिला फिदायीन हल्लेखोरांना रणांगणात उतरवले आहे. बलुच महिलांशी लढणे किती कठीण आहे, हे पाकिस्तानला लवकरच कळेल, अशा आशयाचे व्हीडीओ व्हायरल होत आहेत. हे केवळ प्रचारयुद्ध नाही, तर सामाजिक आणि मानसिक पातळीवर दिलेले आव्हान आहे. पारंपरिक समाजरचनेत महिलांचा अशा प्रकारे सशस्त्र लढ्यात सहभाग वाढणे म्हणजे असंतोष किती खोलवर रुजलेला आहे, याचे द्योतक आहे. बलुचिस्तानमधील संघर्ष केवळ बीएलएपुरता मर्यादित नाही. इतरही अनेक बलुच संघटना पाकिस्तानविरोधात आक्रमक भूमिका घेत आहेत. स्वातंत्र्याच्या मागणीसाठी रेल्वे मार्ग, लष्करी तळ, सुरक्षा दल, तसेच चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर, ग्वादर बंदर, महामार्ग आणि ऊर्जा प्रकल्प यांना सातत्याने लक्ष्य केले जात आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या बलुचिस्तानमध्ये स्थानिक लोकांना मात्र दारिद्र्य, बेरोजगारी आणि विकासापासून वंचित राहावे लागत असल्याची तीव्र भावना आहे. आमच्या जमिनीतील संपत्ती आमच्यासाठी नाही, तर इस्लामाबाद आणि बीजिंगसाठी आहे, हा रोष आता हिंसक स्वरूप धारण करत आहे. चीनची वाढती गुंतवणूक आणि पाकिस्तानचे लष्करी संरक्षण हे स्थानिक बलुचांसाठी शोषणाचे प्रतीक बनले आहे. त्यामुळेच चीनशी संबंधित प्रकल्पांवरही हल्ले होत आहेत. गेल्या वर्षी क्वेटाहून पेशावरला जाणाऱ्या जाफर एक्स्प्रेसवर झालेला हल्ला आणि संपूर्ण रेल्वे बंडखोरांनी ताब्यात घेणे, ही घटना पाकिस्तान सरकार आणि लष्कराच्या अपयशाचे ठळक उदाहरण मानले जाते. याआधीही रेल्वे रूळ उडवणे, रॉकेट हल्ले करणे, रिमोट कंट्रोल बॉम्बस्फोट घडवणे अशा घटना सातत्याने घडत आहेत. इतिहासाकडे पाहिले तर बलुचिस्तानचा असंतोष अचानक उगवलेला नाही. भारत-पाकिस्तान फाळणीनंतर १४ ऑगस्ट १९४७ ते मार्च १९४८ या काळात बलुचिस्तान स्वतंत्र होता. त्या काळात पाकिस्तानसोबत मैत्री करार झाला होता; मात्र सक्तीने या प्रांताचे पाकिस्तानमध्ये विलिनीकरण करण्यात आले. तत्कालीन शासक मीर अहमद यार खान यांनी स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा केली होती आणि स्वायत्ततेची भूमिका ठामपणे मांडली होती. ही ऐतिहासिक जखम आजही बलुच जनतेच्या स्मरणात ताजी आहे. आज पाकिस्तान बलुचिस्तानमध्ये केवळ लष्करी बळावर प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र इतिहास साक्ष देतो की, बंदुकीच्या धाकाने दडपलेले प्रश्न अधिकच पेट घेतात. महिलांचा वाढता सहभाग, चीनविरोधी रोष आणि तरुणांमधील बंडखोरी हे संकेत पाकिस्तानसाठी धोक्याची घंटा आहेत. जर राजकीय संवाद, न्याय, विकास आणि स्थानिकांना विश्वासात घेण्याची प्रक्रिया सुरू झाली नाही, तर बलुचिस्तानचा संघर्ष पाकिस्तानच्या एकात्मतेलाच सुरुंग लावू शकतो. असे झाल्यास पाकिस्तानचे तीन तुकडे होतील आणि तसे होणे हे भारताच्या दृष्टीने अत्यंत उपयोगाचे ठरू शकते. दुभंगलेला किंवा तिभंगलेला पाकिस्तान स्वतःची विक्री चीनला करेल आणि तसे झाल्यास तो आपल्या देशाला धोका ठरू शकेल. तूर्तास तरी भारतामध्ये दहशतवादी कारवाया करून देशाच्या एकात्मतेला सुरुंग लावू पाहणाऱ्या नापाक वृत्तीच्या आणि कृतीच्या पाकिस्तानला त्याचे फळ मिळाल्यास तो नैसर्गिक ठरेल आणि त्याचा धडा इतरही राष्ट्र घेतील अशी अपेक्षा करूया.

# करा सुधारणा 'स्व'ची...

जीवन जगताना बारकाईने विचार केला तर आपण स्वतःपेक्षा नेहमी इतरांचे जास्त परीक्षण करतो. जीवनाच्या अनेक वळ-णावर वेगवेगळी माणसे भेटतात. त्यांचा सहवास लाभतो. संपर्कात आलेल्या अशा विविध माणसांचे भावविश्व आपण अनुभवलेले असते. आपण स्वतःपेक्षा जास्त दुसऱ्यांच्या भावभावना समजून घेण्याचा प्रयत्न करतो. दुसऱ्याची होणारी घुसमट समजते. दुसऱ्याचे दुःख कळते. दुसऱ्याला आलेला रागही कळतो. एका कटाक्षात दुसऱ्याची नाराजी कळते. सहजच दुसऱ्याचे सुखही लक्षात येते. दुसऱ्याचा स्वार्थ समजतो. पण याच सगळ्या गोष्टी स्वतःच्याही असतात. त्या तेवढ्या प्रखरपणे स्वतःला कळत नाहीत का...? कदाचित कळत असूनही माणूस त्याकडे मुद्दामहुन दुर्लक्ष करतो. हेतू पुरस्कृत कानाडोळा करतो. माणसाने आत्मचिंतन करावे. असे माणसाला वाटते खरे; पण माणूस मनापा-सून आत्मचिंतन करत नाही.

बोलताना आपण अनेक वेळा सहज बोलून जातो. मी त्याला पुरता ओळखून आहे. मला त्याची संपूर्ण कुंडली माहित आहे. मला त्याच्याबद्दल खडानखडा माहिती आहे. मी त्याला अंतर्बाह्य ओळखतो. यासारखे अनेक विधाने आपण सदोदित करत असतो. आपल्याला माणसे चांगली पारखता येतात. असा अनेक जणांना खूप मोठा भ्रम असतो. याच गोष्टीची ते प्रौढी मिरवतात. प्रत्यक्षात तसे काही नसते. ज्याअर्थी माणूस स्वतःला समजून घेऊ शकत नाही. स्वतःचे गुणदोष पारखू शकत नाही. खऱ्या अर्थाने माणसाला स्वतःची ओळख होत नाही. तोच माणूस इतरांना परिपूर्ण रित्या समजू शकेल काय...? जो व्यक्ती मी दुसऱ्याला चांगल्या प्रकारे ओळखतो. असे म्हणतो. अशा व्यक्तीला एक प्रश्न अवश्य विचारा. तुम्ही कसे आहात...? या एका प्रश्नांचे अगदी अचूक, वस्तुनिष्ठ असे उत्तर देता येईल का...?

खूप विचार करा. पूर्णपणे विचारात हरवून जा. बघा विचार करून... कसा आहे मी...? चांगला आहे ; की वाईट आहे. स्वाभिमानी आहे; की दुराभिमानी आहे. शांत आहे; की रागीट आहे. मनमोकळा आहे; की कुढ्या स्वभावाचा आहे. आनंदी आहे की; दुःखी आहे. खरा आहे ; कीखोटा आहे. वस्तुनिष्ठ आहे ; की व्यक्तिनिष्ठ आहे. गुणग्राहक आहे ; की गुणद्वेष्टा आहे. समजूतदार वृत्तीचा आहे ; कि आडमुठ्या वृत्तीचा. थोडक्यात कसा आहे मी...? खरोखरच मी स्वतःला ओळखू शकलोय का...? मी जर स्वतःलाच ओळखले नसेल; तर मी दुसऱ्याला ओळखू शकतो का..? मला इतर माणसे पारखता येतील का...?

स्वतःला ओळखणे एवढे सोपे नसते. 'स्व'ची ओळख करता-करता मनुष्यजीवन अक्षरशः मार्गी लागते. संपूर्ण आयुष्य संपता संपता माणसाला काही अंशी 'स्व'ची जाणीव होते. मरणासन्न अवस्थेमध्ये आपण स्वतःला उलगडू लागतो. मरण दारात उभे असताना काही अंशी खरा वस्तुनिष्ठ 'स्व' आपल्याला समजायला लागतो. त्यावेळी कळते आयुष्यभर आपण जो 'मीपणा' बाळगला तो केवळ गर्व आणि अहंकार होता. खरा 'स्व' आपण ओळखलाच नाही. आयुष्यभर आपण जो 'स्व' प्रस्तुत केला. सादर केला. तो केवळ मुखवटा होता. खरा 'स्व' तर काही वेगळाच आहे. आजपर्यंत आपण आपल्या चेहऱ्यावर, स्वभावावर आणि शरीरावर सुद्धा अनेक मुखवटे दिखाव्यासाठी लावले. त्याच मुखवट्याकडे संपूर्ण जगाने पाहिले. संपूर्णतः खोटा असला तरी जगाने स्वीकारलेल्या मुखवट्यालाच आपण स्वतःचे नाव दिले. प्रत्यक्षातला खरा 'स्व' मात्र तसाच राहिला अंधारात. कायमचा एकटाच स्वतःच्या दुनियेत. 'स्व' कसाही असो तो लवकरात लवकर शोधायला लागा. मरण दारात उभे असल्यावर कळलेल्या 'स्व' ला काहीही अर्थ नसतो. त्यावेळी आपल्यातले गुण-अवगुण कळून काहीच साध्य होत नाही. खऱ्या अर्थाने स्वतःला समजून घेण्याची गरज आता आहे. आत्ता जर आपण स्वतःला समजून घेतले तर आपल्यातील वाईट गुण आपण संपवू शकतो. चांगले गुण असतील तर ते वाढवू शकतो. अजिबातच नसतील तर नव्याने चांगल्या गुणांचा शोध घेऊन त्याची आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये रुजवण करता येईल. आणि खऱ्या अर्थाने मनुष्यजीवन सार्थकी लावता येईल.अध्यात्म ही काही वेगळे सांगत नाही. खऱ्या अर्थाने 'स्व' ची ओळख म्हणजेच देवाची ओळख आहे. हेच खरे अध्यात्म आहे. यासाठी सगळ्यात महत्त्वाचे आहे आत्मचिंतन करून वस्तुनिष्ठपणे स्वतःला ओळखणे. खऱ्या अर्थाने स्व'ची जाणीव करून घेणे.

खूप गहन विचार करण्याच्या भानगडीत पडू नका. गोष्ट खूप साधी-साधी आणि सरळ-सरळ आहे. माणसाला स्वतःचे स्वतःला आ-ेळखणे कठीण आहे. त्याअर्थी दुसऱ्या व्यक्तीला तो वस्तुनिष्ठ ओळखू शकत नाही. याच गोष्टीची दुसरी बाजू अशीही आहे. सर्वच माणसे, सर्वच वेळी, सर्वांशीच सारखीच वागत नसतात. स्थळ, काळ, वेळ आणि व्यक्ती परत्वे माणसाचे वागणे बदलत जाते. यालाच 'जशास तसे' वागणे



असेही म्हणतात. खरे पाहता खूप उत्कृष्ट स्वभाव असणाऱ्या माणसाने सुद्धा सर्वांशीच चांगले वागावे असे काही नसते. चांगल्या माणसानेसुद्धा फक्त चांगल्या माणसासोबत चांगले वागावे. असे अपेक्षित असते. वाईट माणसासोबत सुद्धा आपण चांगल्या माणसाएवढेच चांगले वागू लागलो.... तर चांगल्या आणि वाईट माणसांमध्ये फरक कोणता राहील...? वाईट सोबत चांगले वागणे म्हणजे चांगल्या माणसावर केलेला अन्याय नाही का..? म्हणून नेहमी जाणत्या माणसाने कायम स्वरूपी जशास तसे वागावे.

जगद्गुरु भगवान श्रीकृष्ण हे खूप उदात्त व्यक्तिमत्व आहे. खऱ्या अर्थाने ते करुणानिधी, दयाघन आहेत. म्हणजेच त्यांनी प्रत्येकावरच करुणा व दयेचा वर्षाव करावा का...? याचा अर्थ.... श्रीकृष्णाने सर्वांचे सर्व गुन्हे माफ करावेत....? तर असे अजिबात करू नये... अर्थात श्रीकृष्णाने असे केलेले नाही. भगवान श्रीकृष्ण कायम धर्माच्या, सत्याच्या बाजूने आणि अधर्माच्या, असत्याच्या विरोधात उभे राहिले. सज्जनांचे रक्षण; तर दुर्जनांचा संहार केला. सहृदयी, योग्य गरजवंतांना मदत केली. अहंकारी गर्विष्ठ माणसाचे गर्वहरण केले. नेहमी चांगल्याशी चांगले ; तर वाईट अशी वाईट वागले. वाईट माणसासोबत चांगले वागणे हा चांगुलपणा होत नाही. वाईटासोबत चांगले वागणे म्हणजे.... त्याच्या वाईट पणाला कळत-नकळत प्रोत्साहन देण्यासारखेच आहे. त्यामुळे व्यक्ती जवळची असो की दूरची.... नेहमी सद्गुणांचा आदर आणि दुर्गुणांचा तिरस्कारच झाला पाहिजे. चांगल्या कामाचे कौतुक तर वाईट कामाचे खंडन झाले पाहिजे.

इतकेच नाही तर याच्याही पुढचा विचार करून असे म्हणता येईल. चांगली आणि वाईट यांचा फक्त दुसऱ्यांच्या बाबतीत विचार करू नये. सगळ्यात अगोदर चांगल्या-वाईट या दोन्ही गोष्टीचा स्वतःच्या बाबतीमध्ये विचार झाला पाहिजे.आपल्यात काय चांगले आहे...? काय वाईट आहे...? कोणते गुण आहेत....? कोणते अवगुण आहेत....? कोणती बलस्थाने आहेत....? कोणत्या उणिवा आहेत....? काय बरोबर आहे....? काय चुकत आहे....? हे शोधले पाहिजे. सगळ्या गोष्टीचा स्वतःच्या बाबतीत बारकाईने विचार केला पाहिजे. कोणतीही संकल्पना प्रथम आपल्यासोबत पडताळून पाहिली पाहिजे. एक अतिशय साधे सोपे उदाहरण देतो. या जगात प्रत्येक माणूस स्वार्थी असतो. फरक एवढाच त्याचे प्रमाण कमी जास्त असेल. पण प्रत्येकात स्वार्थ मात्र नक्कीच असतो. सबंध जगाच्या पाठीवर, पृथ्वीवरल्या संपूर्ण सजीव सृष्टीमध्ये अनेक जीव आहेत. या सर्व जीवांमध्ये मनुष्यप्राणी हा सर्वात बुद्धिमान आहे. निरागस मुले आणि निरागस प्राणी यांना गरजा असतात. परंतु मतलब नसतो. निरीक्षण करून पहा... प्राणी आपल्या गरजा भागवतात. पण वर्षानुवर्षासाठी कधीही साठा करताना दिसत नाहीत. आजचा दिवस भागवणे, आजची वेळ भागवणे हेच त्यांच्यासाठी महत्त्वाची असते. निरागस मुले म्हणजे मतलबी होण्याएवढे बुद्धी न आलेली बालके सुद्धा आपल्याला खूप चांगली वागतांना दिसून येतात.परंतु बुद्धीने परिपूर्ण झालेला माणूस मात्र स्वार्थाने वागतांना दिसतो. या जगात कोण स्वार्थी नाही...? याचा विचार केला तर फार उदार अंतःकरणाची माणसे सोडली तर सर्वसामान्य सर्वच माणसे स्वार्थी असल्याचे दिसून येते.

असे असले तरी प्रत्यक्षात आपल्यामध्ये असणारा स्वार्थीपणा सहजासहजी आपल्याला जाणवत नाही. आपण अगदी सहजपणे दुसऱ्याला स्वार्थी म्हणून मोकळे होतो. खरे पाहता तो एकटाच स्वार्थी नसतो. त्याच्या एवढाच स्वार्थ प्रत्येकातच असतो. स्व-ार्थीपणा बाबतीतच नाही तर सर्वच गुण-दोष कमी अधिक प्रमाणात प्रत्येकात असतात. आपण मात्र आयुष्यभर सातत्याने दुसऱ्यांना पारखत, निरखत रा-हतो. दुसऱ्याचे मूल्यमापन करतो. सातत्याने इतर माणसे कशी आहेत त्यांच्याबद्दल बोलत असतो. इतरांवर टीका टिपणी करतो. कुणीही मागणी केली नसताना सतत सल्ले देत असतो. पण माझ्या मते या कुठल्याच गोष्टीची गरज नाही. आपण पहिल्यांदा आपल्या स्वतःचे आत्मचिंतन केले पाहिजे. स्वतःतील गुण-दोष समजून घेतले पाहिजे. आणि स्वतःच्या स्वभावात आणि वागण्यात सुधारणा करण्याचा विचार प्राधान्याने केला पाहिजे. या अनुषंगाने माझी एक कविता आहे या कवितेनेच या लेखाचा शेवट करणे योग्य वाटते.

करा सुधारणा 'स्व'ची........
कोण चांगले-वाईट...?
नका ठरवू क्षणात
दृष्टिकोन ज्याचा-त्याचा
तशी प्रतिमा डोळ्यात....
दुसऱ्याचे गुण-दोष
फक्त समज मनाची
व्यर्थ अंदाज माणसा
नसे पारख स्वतःची....
जसे विचार जयांचे
तसा हेतू आणि ध्यास
जशा घडती घटना
तसा वागतो माणूस....
मन, बुद्धी भिन्न-भिन्न
भिन्न विचार साऱ्यांचे
काय तुलना कुणाशी...?
व्यक्तिमत्व ज्याचे त्याचे....
भिन्न माणसा सोबत
असे वागणे निराळे
बरे आणिक वाईट
लोक असती सगळे....
काय पारखता लोका...?
नसे गरज हो त्याची
मन ठेवूनी पवित्र
करा सुधारणा 'स्व'ची....

**-मयूर जोशी**
विठ्ठल रुक्मिणी नगर, जिंतूर.
जि. परभणी.
मो. ९७६७७३३५६०
७९७२३४४१२८

# पुस्तके वाचण्याच्या वयात चेहरे वाचू नका...

प्रेमाचा आठवडा सुरू झालेला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस प्रेमविरांसाठी अच्छे दिन आहेत. तसे बघता प्रेमासाठी निश्चित असा एखादा दिवस किंवा एखादा काळ नसतो. तरीही फेब्रुवारी महिन्याची प्रेमवीर आतुरतेने वाट बघत असतात. कारण फेब्रुवारी महिन्यात प्रेमविरांचे प्रेम जरा जास्तच उतू जात असते. रोज डे, प्रॉमिस डे, प्रपोज डे, किस डे, व्हॅलेन्टाईन डे असे दिवस साजरे करत असताना आमच्या प्रेमवीरांच्या आयुष्याचे घोडे कसे लागतात हे प्रेमविरांना कळत सुद्धा नाही. त्यामुळे या प्रेमामध्ये अनेक प्रेम(वीर) होत असल्याचे चित्र समाजामध्ये सातत्याने वाढत आहे. त्यामुळे हा लेखप्रपंच.



प्रेम नावाच्या दोन अक्षराच्या शब्द-ाने कित्येक लोकांचे जीवन सुंदरपणे घडविले आहे. पण आजकालच्या तरुण-तरुणींना प्रेम घडवत कमी आणि बिघडवत जास्त असल्याचे चित्र समाजात दिसत आहे. सकाळी सकाळी कोणतेही वर्तमानपत्र उघडले की, प्रेमामध्ये किंवा प्रेमासाठी एका तरी तरुण-तरुणीची हत्या किंवा आत्महत्येची बातमी हमखास आपल्याला दिसते. खरंच आयुष्य इतकं स्वस्त झाले आहे का? ज्या वयामध्ये प्रचंड मेहनत घेऊन आयुष्य घडवायचे असते त्या वयात आमचे तरुण मित्र-मैत्रिणी एखाद्या व्यक्तीसाठी स्वतःचे सुंदर असे आयुष्य संपवत असतील तर ही दुर्दैवाची आणि चिंताजनक बाब आहे हे आपण समजून घेतले पाहिजे.

प्रेम करू नये असे नाही. परंतु आज प्रेम करण्याची पद्धतही काळानुसार बदललेली दिसते आहे. काही दिवसापूर्वी एका व्यावसायिकाच्या घरी बसलो होतो. त्यांनी चिंता व्यक्त केली की, आम्ही दररोज रात्री आमचे दुकान बंद करून घरी परत येताना काही जोडपे आम्हाला रस्त्यावरील एखाद्या झाडा- झुडपातून बाहेर निघतांना दिसतात. झाडाझुडपात जोडपे काय करायला जात असतील हे आता वेगळे सांगायला नको आणि हल्ली आई वडिलांना सुद्धा हे विचारायला वेळ नाही की, आपला मुलगा/मुलगी रात्रीच्या वेळी कुठे जातो. मग एखाद्या वेळी असे काही प्रसंग घडतात की त्यावेळी आई- वडिलांना डोके धरून बसल्याशिवाय आणि पश्चातापाशिवाय पर्याय राहत नाही.

ती किंवा तो भेटला नाही म्हणून स्वतःला संपविणाऱ्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक तरुण-तरुणींनी स्वतःचे सुंदर असे आयुष्य प्रेमासाठी बरबाद करत आहेत आणि अक्षरशः आपल्या सोबत आपल्या आई-वडिलांच्या कित्येक स्वप्नांचाही चुराळा करत आहेत आणि ही बाब आजच्या घडीला खूप भयंकर चिंताजनक आहे. त्यामुळे प्रेम करू नका असे मी अजिबात म्हणणार नाही. परंतु स्वतःला ओळखा. आपल्या स्वप्नांचा विचार करा. आपल्या आई वडिलांचा विचार करा. आपण आपला अमूल्य असा वेळ कुणासाठी देत आहोत हेही समजून घ्या. कारण एकदा गेलेली वेळ पुन्हा परत येत नाही आणि हातात काही नसेल तर सोबत अस-लेली व्यक्ती सुद्धा आपल्याला भेटत नाही हेही तितकेच खरे.

त्यामुळे प्रेमामध्ये दिशाहीन होऊन इकडे तिकडे पसरण्यापेक्षा वेळ असतानाच स्वतः सावरावणे कधीही चांगले. कारण एकेकाळी आपआपल्या क्षेत्रामध्ये नावाजलेली अनेक तरुण मंडळी या प्रेमाच्या चक्रव्युहामध्ये अशी काही अडकली की, आज सन्मानाने चारचौघात उभे सुद्धा राहत नाही. ज्यांचा समाजामध्ये कायम बोलबाला होता ते हल्ली कुठेही दिसत नाही. प्रेमामध्ये मिळालेल्या विरहात एकेकाळची हस्ती असलेल्या तरुण मंडळींनी जिंदगी सस्ती करून दारू आणि खर्रासोबत दोस्ती केली. ज्यांच्या वाणीतून कधीकाळी सुंदर असे मंत्रमुग्ध करणारे विचार बाहेर यायचे त्यांच्याच तोंडातून आज दुर्गंधी येते. त्यामुळे कोणतेही व्यसन पडवडते पण माणसांचे नको. कारण माणसाला माणसांचे लागलेले व्यसन हे जगातील कोणत्याही व्यसनापेक्षा फार खतरनाक असते.

तरुण वयामध्ये प्रेम करत असताना आपल्याला काही वाटत नसते. कारण सुख, समाधान, आनंद, मोह यामध्ये आपण बरेच खुश असतो पण पुढे जसे वय वाढत जाते तशी करिअरची चिंता वाटायला लागते आणि ज्यावेळी हातामध्ये काहीच राहत नाही तेव्हा मग आपल्यावर पश्चातापाची वेळ येते. पण तेव्हा आपल्या हातातून वेळ गेलेली असते. आपली वाट चुकलेली असते. काय करावे कळत नाही. यामुळे ताणतणाव वाढतो. तणावातून नको ते विचार मनामध्ये येतात आणि बरबादीकडे आपले एक पाऊल आपण टाकतो. त्यामुळे तरुण वयामध्ये कुणाच्या तरी प्रेमात पडण्यापेक्षा आणि कुणाचे तरी चेहरे वाचत बसण्यापेक्षा पुस्तके आणि समाज वाचणे कधीही चांगले. कारण यातून किमान चांगला माणूस तर घडेल...

**-सुरज पी दहागावकर**
चंद्रपूर
मो. ८६९८६१५८४८

# मूल्यशिक्षण काळाची गरज

शाळेची बॅग फाडली या कारणामुळे एका शाळकरी विद्यार्थ्याने दुसऱ्या शाळकरी विद्यार्थ्यावर चाकूने वार केल्याची घटना पुण्यात नुकतीच घडली. पुण्यासारख्या शिक्षणाच्या माहेरघरात घडलेल्या या घटनेतील आरोपी शाळकरी अर्थात अल्पवयीन असल्याने सर्वत्र खळबळ माजली आहे अर्थात अल्पवयीन मुलांनी केलेला हा पहिलाच गंभीर गुन्हा नाही याआधीही असे अनेक गुन्हे अल्पवयीन मुलांकडून घडले आहेत.

दोन वर्षापूर्वी क्राईम मालिका पाहून एका अल्पवयीन मुलाने आपल्या आजीची हत्या केल्याची घटना पुण्यातच घडली होती. मागील वर्षी एका आठ वर्षीय मुलाने आपल्याच पाच वर्षीय बहिणीवर ब्लेडने वार करून हत्या केल्याची घटना जालना शहरात घडली होती. अल्पवयीन मुलांकडून असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडल्याच्या बातम्या अलीकडे सातत्याने वर्तमानपत्रात वाचायला मिळतात याचाच अर्थ देशात बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे. सण २०२२ - २३ या एका वर्षात एकट्या पुणे शहरात अशा प्रकारचे २४८ गुन्हे घडले असून पुण्याच्या ग्रामीण भागात १०४ गुन्हे घडले आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी नमूद करण्यात आली आहे.

जर एकट्या पुण्यात अल्पवयीन मुलांकडून इतके गुन्हे होत असतील तर संपूर्ण राज्यात आणि देशात अल्पवयीन मुलांकडून किती गुन्हे घडत असतील याची फक्त कल्पना केली तरी अंगावर काटा येतो. अर्थात देण्यात आलेली ही आकडेवारी फक्त नोंद झालेल्या गुन्ह्यांचीच आहे. पोलिस दप्तरी नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी काही गुन्हे खून, बलात्कार, विनयभंग, अपहरण यासारखे गंभीर स्वरूपाचे देखील आहेत. गेल्या काही वर्षात बाल गुन्हेगारीचे प्रमाण खूप वाढले आहे.



आजकालची मुले गुन्हेगार बनत आहेत ही अत्यंत धोक्याची व खेदाची बाब आहे. झोपडपट्टीत राहणारे अल्प उत्पन्न गटातील मुले गुन्हेगारीकडे लवकर ओढले जातात असे म्हंटले जाते. त्यांचे आई वडील मोल मजुरीसाठी घराबाहेर राहतात त्यामुळे ते मुलांना योग्य संस्कार देऊ शकत नाहीत परिणामी ही मुले गुन्हेगारीकडे वळतात असा तर्क काढला जातो. पण पुण्यातील या व आधीच्या घटनेने तसेच जालन्यातील घटनेने हा तर्क चुकीचा ठरवला आहे. या तिन्ही घटनेतील मुलांचे पालक उच्चशिक्षित असून हे तिन्ही मुले शहरातील प्रतिष्ठित शाळेतील विद्यार्थी आहेत. याचाच अर्थ सुशिक्षित पालकांचे मुलेही आता गुन्हेगारीकडे वळू लागले आहेत.

भारतासारख्या देशात वाढती बाल गुन्हेगारी ही मोठी समस्या बनली आहे. आजकालच्या मुलांमध्ये भाई, दादा, डॉन बनण्याची मोठी क्रेझ आहे. त्यामुळे ते गुन्हेगारीकडे वळत आ-हेत. अल्पवयीन मुलांच्या टोळ्या, गँग वाढत आहेत. पालकांचे लक्ष नसल्याने चोऱ्या, मारामारी, खून यासारख्या गुन्ह्यात अल्पवयीन मुले अडकत आ-हेत. या मुलांना वेळीच सल्ला किंवा मार्गदर्शन मिळत नाही ही वसतुस्थिती आहे. देशातील बाल गुन्हेगारी वाढत आहे ही धोक्याची घंटा आहे. ती कमी करण्यासाठी मुलांना संस्कारक्षम वयात पालक, शिक्षक, समाज यांच्याकडून योग्य संस्कार व मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. लहान वयात मुले काय करतात, त्यांच्या आवडीनिवडी काय आहेत याचाही विचार आई वडीलांनी करायला हवा. अभ्यासाकडे मुले दुर्लक्ष का करतात याचाही विचार पालक आणि क्षिक्षकांनी करायला हवा.

शिक्षणाऐवजी मुले गुन्हेगारीकडे वळत आहे ही चिंतनीय बाब आहे याला जितकी सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे तितकीच कौटुंबिक परिस्थिती देखील जबाबदार आहे. आपल्या देशात जोवर एकत्र कुटुंब पद्धती होती तोवर बाल गुन्हेगारीचे प्रमाण नगण्य होते पण एकत्र कुटुंब पद्धतीचा रहास झाला आणि बाल गुन्हेगारी फोफावत गेली असे म्हटल्यास वा-वगे ठरणार नाही. मुलांना चांगले शिक्षण देण्यासाठी पालक वाट्टेल ते करतात. त्यांना मोठ मोठ्या इंटरनॅशनल स्कूलमध्ये लाखो रुपये डोनेशन देऊन दाखल करतात. त्यांना हव्या त्या सर्व वस्तू पुरव-तात पण मुलांसोबत वेळ घालवण्यास पालकांना फुरसत नसते. त्रिकोणी, चौकोनी कुटुंब पद्धतीत आजी आजोबा ही संकल्पना केंव्हाच मागे पडली आहे.

आई-वडील दोघेही नोकरीस असेल तर मुले दिवसभर घरी एकटीच असतात अशावेळी टीव्ही आणि मोबाईल हेच त्यांचे साथीदार असतात. मग दिवसभर टीव्ही वरील क्राईम मालिका पाहणे आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळणे हाच त्यांचा उद्योग. दिवसभर क्राईम मालिका पाहून आणि मोबाईलवर हिंसक गेम खेळून मुलांच्या मनातही हिंसक विचार येतात. त्यातूनच मग अशा घटना घडतात. त्यामुळेच आज मूल्यशिक्षणाची मोठी गरज निर्माण झाली आहे. आज मुलांना जितकी शिक्षणाची गरज आहे तितकीच मूल्यशिक्षणाचीही आहे. परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आकडेवारीत मूल्यशिक्षण हरवत चालले आहे. मुलांवर संस्कार करण्यात पालक, शिक्षक आणि समाज कमी पडत आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी मूल्यशिक्षणाला पर्याय नाही. मूल्यशिक्षण काळाची गरज बनली आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो.९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### नांदेड शहराला पर्यटन क्षेत्र व पवित्रस्थळाचा दर्जा देण्याची शासनाकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील सामाजिक व आरटीआय कार्यकर्ता जगदीपसिंघ नंबरदार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नांदेड शहराला पर्यटन क्षेत्र तसेच पवित्रस्थळाचा दर्जा देण्याबाबत निवेदन सादर केले आहे.

नांदेड हे सिख धर्माचे अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र असून येथे दहावे गुरु श्री गुरु गोबिंदसिंघजी महाराज यांचे अंतिम स्थान आहे. येथे स्थित तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहेब हे सिख धर्मातील पाच तख्तांपैकी एक प्रमुख तख्त असून जगभरातील सिख बांधवांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे. सन २००८ मधील श्री गुरुगोविंदसिंगजी महाराज यांच्या गुरुतागद्दी त्रिशताब्दी सोहळा आणि २४–२५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे भव्यदिव्यरित्या पार पडलेला गुरु तेगबहादुर साहेबांचा ३५० वा शहिदी दिवस (हिंद–दि–चादर) यामुळे नांदेड शहराला जागतिक स्तरावर विशेष ओळख मिळाली आहे.

### आंबेडकरवादी मिशन नेक्स्ट आयएएस दिल्लीचे नामवंत क्लासचे निःशुल्क यूपीएससी मार्गदर्शन वर्ग

**नांदेड (प्रतिनिधी)**– सर्व जाती–धर्मातील विद्यार्थ्यांसाठी आंबेडकरवादी मिशनमध्ये निःशुल्क यूपीएससी मार्गदर्शन वर्ग सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, नवी दिल्ली येथील नामांकित नेक्स्ट आय्एएस ह्या क्लासच्या मार्गदर्शन सुविधा निःशुल्क उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सर्व जाती – धर्मातील विद्यार्थांसाठी मोफत मार्गदर्शन वर्ग सुविधा उपलब्ध असतील. दररोज सकाळी ८ ते दुपारी २ पर्यंत यूपीएससी– २०२६ साठी फॉर्म भरलेल्या विद्यार्थ्यांसाठी हे निःशुल्क वर्ग असून, गरजूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी केले आहे.

# देश संरक्षणासाठी बंजारा समाजाचे योगदान विसरता येणार नाही

## खा. अशोक चव्हाण यांचे प्रतिपादन

**भोकर (प्रतिनीधी)**– ऐतिहासिक व धार्मिक कार्यातील बंजारा समाज नेहमी अग्रेसर आहे. जीवाची पर्वा न करता देशाच्या संरक्षणासाठी पुढे येणाऱ्या बंजारा समाजाचे योगदान विसरता येणार नाही, असे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी केले. नांदा बु. तांडा येथे सद्गुरू बाल ब्रम्हचारी रामराव महाराज यांच्या पुतळ्याच्या भूमिपूजन सोहळ्यानिमित्त शनिवारी आयोजित कार्यक्रमात खा. चव्हाण बोलत होते.



रामराव महाराज यांच्या पुतळ्याचे व मंदिराचे भूमिपूजन शेखर महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ. श्रीजयाताई चव्हाण, सभापती जगदीश पाटील भोसीकर, नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, रमेश राठोड, रामचंद्र मुसळे, बालाजी शानमवाड, मारोतराव बल्लाळकर, बाबुराव सायाळकर, गणपतराव जाधव, केशव पाटील पोमनाळकर, डॉ. मनोज गिमेकर, डॉ. फिरोज इनामदार, डॉ. राम नाईक, उज्ज्वल केसराळे, उत्तम राठोड, रोहीदास जाधव, विनोद चव्हाण, सुहास पवार, सिध्देश्वर पिटलेवाड, मारोती भोंबे, बाळू महाराज, साईनाथ राठोड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना खा. चव्हाण म्हणाले की, बंजारा सामाजाने शंकरराव चव्हाण यांच्या काळापासून नेहमीच अडचणीच्या काळात दिलेली साथ आम्ही कधीच विसरू शकत नाही. संत सेवालाल महाराज, रामराव महाराज आमचे दैवत आहेत. लक्कीशहा बंजारा यांच्या कार्याची आठवणही त्यांनी करून दिली. संत सेवालाल महाराज व रामराव महाराज यांचे भव्य असे ७ कोटीचे स्मारक भोकर येथे होत असल्याचे सांगून नांदा बु. तांडा विकास कामासाठी त्यांनी २५ लाख रुपये जाहीर केले. यावेळी शेखर महाराज यांनी बंजारा समाजाने व्यसनापासून दूर राहून संत सेवालाल महाराज, रामराव महाराज यांच्या विचारांचे आचरण करून शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले. यावेळी सूत्रसंचालन गणेश चव्हाण यांनी केले तर आभार संतोष चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमास परिसरातील बंजारा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# मुके प्राणी व पक्ष्यांच्या जीविताला धोका; नांदेडमधील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या काच कुंपणावरून वाद



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील प्रसिद्ध शैक्षणिक संस्था असलेल्या श्री गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, विष्णुपुरी येथे उभारण्यात आलेल्या संरक्षण भिंतीवर (कंपाऊंड वॉल) काचांचे धारदार कुंपण बसवण्यात आले आहे. मात्र या काच कुंपणामुळे परिसरातील मुके जनावर, पक्षी व इतर प्राण्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाल्याची चिंता सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

या कंपाऊंडवॉलवर बसवलेली काच अत्यंत टोकदार असून, पक्षी बसण्यासाठी, मांजर किंवा माकड चढण्यासाठी तसेच सरपटणाऱ्या प्राण्यांच्या हालचालींसाठी ती अतिशय धोकादायक ठरत आहे. जर एखादा प्राणी या भिंतीवर थांबला किंवा चुकून घसरला, तर ही काच त्यांच्या शरीरात घुसून गंभीर जखम किंवा मृत्यू देखील होऊ शकतो.

याबाबत इट्स माय राइट्स फाउंडेशन या सामाजिक संस्थेचे संचालक चंद्रप्रकाश देगलूरकर व प्रवीण जेठेवाड यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की, प्राणी संरक्षण कायद्याच्या अनुषंगाने अशी धोकादायक रचना उभारणे हा गुन्हा ठरू शकतो. प्रशासनाने तातडीने या काच कुंपणावर कारवाई करून सुरक्षित उपाययोजना कराव्यात.

सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, वन्यजीव संरक्षण कायदा तसेच प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यांतर्गत अशा प्रकारे प्राण्यांच्या जीवाला धोका पोहोचवणाऱ्या संरचना बेकायदेशीर ठरू शकतात. परिसरातील नागरिकांनीही महाविद्यालय प्रशासनाने तात्काळ ही काच काढून सुरक्षित लोखंडी जाळी किंवा इतर पर्यावरणपूरक पर्याय वापरण्याची मागणी केली आहे. जर वेळेत योग्य पावले उचलली नाहीत, तर भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशाराही सामाजिक संघटनांनी दिला आहे.

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांना नुकताच निरोप देण्यात आला. या कार्यक्रमात पूर्णा येथील श्री गुरु बुद्धी स्वामी वरिष्ठ महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य डॉ. आदिनाथ इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य स्वाती मुनेश्वर व प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक मारोती हांडे यांची उपस्थिती होती.

डॉ. आदिनाथ इंगोले यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांना महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करण्यास सांगितले. तसेच करिअर विषयक मार्गदर्शन करताना भावी आयुष्याच्या वाटचालीसाठी परीक्षेला सामोरे जातांना तणावमुक्त राहण्याच्या सूचना दिल्या. याबरोबरच मुख्याध्यापक मारोती हांडे, प्रा. रमेश पातेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डी. बी. थावरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रामेश्वर भालके यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. प्रमोद वाघमारे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. मनीषा येरेकर यांच्यासोबत विद्यार्थी प्रतिनिधी वैष्णवी जोंधळे व संकेत पाईकराव आदींनी परिश्रम घेतले.

# जुनागंज ते मन्सूरखान हवेली रस्त्यावर होणारे निकृष्ट ड्रेनेज लाईनचे काम थांबविण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील जुनागंज– मन्सूर खॉन हवेली ते नावघाट पुलापर्यंत होणारे निकृष्ट दर्जाचे ड्रेनेजचे काम थांबवून दोषींवर कारवाईची मागणी एका निवेदनाद्वारे महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

जुनागंज – मन्सूर खॉन हवेली ते नावघाट पुलापर्यंत सुरू असलेल्या ड्रेनेज लाईनच्या कामाकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष नसल्याने संबंधित कंत्राटदार अतिशय निकृष्ट दर्जाचे काम करत आहेत. ते काम तातडीने थांबवून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तक्रारकर्त्यांने या प्रकरणाची चौकशी व्हावी असे निवेदन दि. ३० जानेवारी रोजी दिले होते. ज्यात नाली व ड्रेनेजचे पूर्णपणे काम केल्याशिवाय रोडचे काम करू नये, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संबंधित विभागाला आम्ही वारंवार विनंती केली होती की, रस्त्याचे काम सुरू करण्यापूर्वी ड्रेनेज नालीचे काम पूर्ण करण्यात यावे. मात्र, तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष करून केवळ रस्ते रेटण्याचे काम सुरू आहे. यामुळे भविष्यात पुन्हा रस्ता खोदावा लागेल आणि जनतेच्या कराचा पैसा वाया जाईल.

**नित्कृष्ट दर्जाचे काम:** सध्या सुरू असलेले रस्त्याचे काम अत्यंत नित्कृष्ट दर्जाचे होत असून त्यात तांत्रिक मानकांचे पालन केले जात नाही.

संबंधित गुत्तेदार मनमानी पद्धतीने काम करत असल्याचे दिसून येत आहे. अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष व संगनमत, या कामातील त्रुटी आम्ही संबंधित रस्ते विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास वारंवार आणून दिल्या. मात्र, अधिकारी जनतेच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून उलट गुत्तेदारालाच सहकार्य करत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. कोणत्याही प्रकारची चौकशी न करता काम पुढे ढकलणे, यात मोठ्या भ्रष्टाचाराची शक्यता नाकारता येत नाही.

या चुकीच्या नियोजनामुळे आणि धुळीमुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा व रहदारीचा प्रश्न निर्माण झाल्याने या परिसरातील नागरिकांनाही नाहक त्रास सहन करावा लागत आहे. येत्या दोन दिवसांत महानगर पालिका प्रशासनाने यावर ठोस निर्णय न घेतल्यास आणि जनतेचा विचार न केल्यास, दिनांक १० फेब्रुवारी रोजी जुना गंज चौरस्ता येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल. यात काही अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील याची नोंद घ्यावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

# दिव्यांग लाभार्थ्यांनी यूडीआयडी व आधार कार्ड तहसील कार्यालयात तात्काळ सादर करावेत –तहसीलदार भगत

**उमरी (प्रतिनिधी)** – विशेष सहाय्य योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले वैश्विक ओळखपत्र व आधार कार्ड तात्काळ तहसील कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन तहसीलदार श्रीमती मंजुषा भगत यांनी केले आहे.



राज्य शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाच्या सूचनान्वये विशेष सहाय्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांचे यूडीआयडी कार्ड व आधार कार्ड संलग्नीकरण करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. उमरी तालुक्यातील विशेष सहाय्य योजनेंतर्गत येणाऱ्या सर्व दिव्यांग लाभार्थ्यांचे यूडीआयडी व आधार कार्ड संलग्नीकरणाची तात्काळ व पूर्ण कार्यवाही करावी. तसेच प्रलंबित प्रकरणांचा तपशीलासह संपूर्ण व अद्ययावत अहवाल सादर करण्यासाठी जमा करावेत. आधार कार्ड सर्व दिव्यांग बांधवांनी तहसील कार्यालयात संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजना विभागातील नायब तहसीलदार संजय सोलंकर, सहायक महसूल अधिकारी गंगाधर टेंभुर्णीवार, महसूल सहायक अशोक कस्तुरे व आय. टी. असिस्टंट धनंजय बोधनकर यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

सूचनांचा विचार करूनही ज्या दिव्यांग बांधवांनी कागदपत्रे नाही दिल्यास होणाऱ्या गैरसोईबाबत व अनुदान बंद झाल्यास लाभार्थी स्वतः जबाबदार असतील असे तहसीलदार मंजुषा भगत यांनी म्हटले आहे.

# बिलोली येथे अखंड शिवनाम सप्ताह व परमरहस्य पारायण सोहळ्याचे आयोजन; आज निघणार मिरवणूक

**बिलोली (प्रतिनिधी)** – शहरातील नवीन बस स्थानकासमोरील दत्त मंदिर परिसरात उभारण्यात आलेल्या महादेव मंदिर येथे दि. ९ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान सर्व धर्मीय अखंड शिवनाम सप्ताह व परम रहस्य पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिवनाम व परम रहस्य पारायण सोहळ्यानिमित्त रविवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी शहरातल्या देशमुख गल्ली येथील महादेव मंदिर ते दत्त टेकडी महादेव मंदिरापर्यंत वसुंधरारत्न शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या पादुकांची मिरवणूक काढण्यात येणार आहे.

शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर, सिद्ध दयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर, वीरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर, चंद्रशेखर महाराज देगलूरकर, राजशेखर शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर, आचार्य गुरुराज महाराज अहमदपूरकर यांच्या दिव्या सानिध्यात पार पडणाऱ्या या अखंड शिवनाम व परमरहस्य पारायण सोहळ्यात दररोज शिवपाठ, रुद्राभिषेक, ग्रंथराज परम रहस्य, मन्मथ गाथ्यावरील भजन व किर्तनाचे कार्यक्रम होणार आहेत. यासाठी शिवभक्त परायण बालाजी महाराज पारडीकर, शिवभक्त परायण कु. शिवानीताई वसमते, शिवभक्त परायण शिवानंद महाराज दापशेटकर, शिवभक्त परायण सौ. धनश्रीताई स्वामी, शिवभक्त परायण अनिल महाराज शेवाळकर, सौ ज्योती रवींद्रस्वामी चाभरेकर, सौ संगीताताई बेंद्रीकर व मोहन कावडे गुरुजी हसनाळीकर यांची किर्तन सेवा लाभणार आहे. तर पारायण प्रमुख शिवभक्त परायण वर्षाताई देशमुख देगलूरे, सौ सुमनताई गणेश बोडके. शिवपाठ प्रमुख सुभाष पाटील बेटमोगरा. विना प्रमुख बसवराज महाराज मंडगीकर, ज्ञानेश्वर विभुते नायगावकर. हार्मोनियम वादक यादव भंडारे बोळेगावकर. मृदंग वादक निळकंठ शेटकर लोहगाव, निलेश ताटे टाकलगाव यांची साथ लाभणार आहे. या सोहळ्यासाठी राचलिंग महाराज हंगरगा यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिराचे सेवेकरी संतोष स्वामी यांच्यासह समस्त गावकरी मंडळी परिश्रम घेत आहेत. आठ दिवस चालणाऱ्या या सर्व धर्मीय अखंड शिवनाम सप्ताह व परम रहस्य पारायण सोहळ्याचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले.

# शाळा दत्तक योजना कार्यक्रम संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रशांती सार्वजनिक वाचनालय, नांदेड आयोजित शाळा दत्तक योजनेचा (फिरते वाचनालय) शुभारंभ नुकताच राजर्षी शाहू विद्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य सुभाष तिवडे होते.

समृद्ध वाचन संस्कृतीचा लाभ विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी प्रशांती सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष तथा शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे ज्येष्ठ संचालक से.नि. प्रा. रावसाहेब शेंदारकर यांनी ५०० ग्रंथ शाळेतील विद्यार्थ्यांना वाचनासाठी शाळेच्या ग्रंथालयास दिली आणि ते वाचून झाल्यानंतर १ हजार ग्रंथ विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करून देण्यासाठी आश्वस्त करण्यात आले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे दाखले देत विद्यार्थ्यांनो वाचते व्हा, असा संदेश दिला. मराठवाडा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गोपाळराव कदम या कार्यक्रमाला संबोधित करताना म्हणाले, विद्यार्थ्यांना वाचाल तर वाचाल असे सांगत असताना शाळेत समृद्ध ग्रंथालयाबरोबर समृद्ध अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्याचे अभिवचन दिले.

# मुलीच्या विवाहातील आहेराची रक्कम वधू पित्याने दिली जि. प. शाळेला भेट




**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** – हरनाळी गावातील मारोती पिराजी जलदेकर यांची कन्या शिवकांता मारोती जलदेकर यांचा विवाह सोहळा दि. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी हरनाळी येथे उत्साहात पार पडला. या विवाह सोहळ्यानिमित्त जमा झालेली आहेराची भेट रक्कम रुपये ४२,३०० हरनाळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेटरूपी देण्यात आली.

विवाहापूर्वीच मारोती जलदेकर यांनी शाळेचे मुख्याध्यापक साजीद शेख यांची भेट घेऊन मुलीच्या विवाहात मिळालेली आहेररूपी रक्कम गावच्या शाळेला मदत स्वरूपात देण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार विवाह संपन्न होताच जमा झालेली रक्कम वधू–वरांच्या हस्ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला सुपूर्द करण्यात आली.

आजच्या काळात मराठी शाळांच्या संवर्धनासाठी अशा दानशूर व्यक्तींची गरज असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले. या आदर्श उपक्रमाबद्दल जलदेकर कुटुंबाचे समाजाच्या वतीने तसेच गावातील ग्रामस्थांकडून सर्वत्र कौतुक होत आहे. याप्रसंगी जि. प. शाळेचे मुख्याध्यापक साजीद शेख व एस. पी. गुडलावार यांनी जलदेकर कुटुंबाचे आभार मानले.

# डॉ. जे. जी. वाडेकर यांच्या स्मरणार्थ राजर्षी शाहू विद्यालयात विज्ञान प्रदर्शन संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड येथील राजर्षी शाहू विद्यालयात स्व. डॉ. जे. जी. वाडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात नांदेड जिल्ह्यातील विविध शाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शवत १६८ प्रयोग सादर केले.



डॉ. काशिनाथ बोगले (प्रा. भौतिकशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ), डॉ. हेमलता भोसले (प्रा. मायक्रोबायोलॉजी विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ), डॉ. गिरीश पांडे (रसायनशास्त्र विभाग प्रमुख, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ) बी.एम. हंगरगे (माजी मुख्याध्यापक तथा प्राचार्य राजर्षी शाहू विद्यालय, नांदेड) यांनी उत्तमरीत्या परीक्षकाची जबाबदारी पार पाडली आणि लगेच निकाल जाहीर करण्यात आला.

पाचवी ते सातवी या गटातून प्रथम पारितोषिक– ऑक्सफर्ड इंटरनॅशनल स्कूल नांदेड, द्वितीय पारितोषिक – ऑक्सफर्ड द ग्लोबल स्कूल नांदेड, तृतीय पारितोषिक – केंब्रिज विद्यालय, नांदेड आणि इंदिरा गांधी हायस्कूल सिडको यांनी तर आठवी ते दहावी या गटातून प्रथम पारितोषिक महात्मा फुले हायस्कूल बाबानगर नांदेड, द्वितीय पारितोषिक – राजर्षी शाहू विद्यालय वसंतनगर नांदेड आणि तृतीय पारितोषिक – महात्मा फुले हायस्कूल बाबानगर नांदेड आणि जिजामाता माध्यमिक विद्यालय नांदेड यांनी पटकावले.

प्रदर्शनाचे उद्घाटन नांदेड येथील सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ, डॉ. गायत्री वाडेकर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मराठवाडा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गोपाळराव कदम आणि सचिव चंद्रशेखर सोनवणे हे होते, तर अध्यक्षस्थान राजर्षी शाहू विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य सुभाष तिवडे यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या उद्घाटक डॉ. गायत्री वाडेकर यांनी व कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष तिवडे यांनी विविध शाळांचे सहभागी विज्ञानप्रेमी विद्यार्थी व विज्ञाननिष्ठ शिक्षक यांना विज्ञान प्रदर्शनाचे महत्त्व विशद केले.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानंद टापरे यांनी केले तर आभार सकाळसत्र प्रमुख तुकाराम जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ. निर्मला खुळे, शाळेतील विज्ञान शिक्षक आनंद मोरे, रत्नाकर कोतापल्ले तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# प्रगतीमंत्र

# बँक ऑफ बडोदामध्ये बना मॅनेजर!; 400 हून अधिक जागा उपलब्ध

**जर तुम्हाला बँकेत सरकारी नोकरी हवी असेल, तर बँक ऑफ बडोदाने डेप्युटी मॅनेजर, असिस्टंट मॅनेजर, मॅनेजर आणि सीनियर मॅनेजरसह विविध अधिकारी पदे भरण्यासाठी नवीन भरती जाहिरात प्रसिद्ध केली आहे. या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज ६ फेब्रुवारीपासून सुरू झाले आहेत. इच्छुक आणि पात्र उमेदवार बँकेच्या अधिकृत वेबसाइट bankofbaroda.bank.in वर या पदासाठी अर्ज करू शकतात. अंतिम मुदत २६ फेब्रुवारी आहे.**

## पदे, कामाचे स्वरुप अन् जागा

- सहायक उपाध्यक्ष १ (MSME रिलेशनशीप) : १४
- उपव्यवस्थापक (MSME संबंध) : ६२
- सहाय्यक व्यवस्थापक (MSME विक्री) : १७७
- वरिष्ठ व्यवस्थापक MSME (रिलेशनशीप) : ११३
- वरिष्ठ व्यवस्थापक (क्रेडिट विश्लेषक) : १९
- व्यवस्थापक (क्रेडिट विश्लेषक) : ३४

- अधिकृत वेबसाइटः bankofbaroda.bank.in
- अर्ज उघडण्याची तारीख : ६ फेब्रुवारी २०२६
- अंतिम तारीख : २६ फेब्रुवारी २०२६
- वय मर्यादा : २२-४० वर्षे, पदानुसार बदलते. राखीव श्रेणींना नियमांनुसार उच्च वयात सूट मिळेल.



## कोणती पात्रता हवी?

- सहाय्यक उपाध्यक्ष, उपव्यवस्थापक आणि सहाय्यक व्यवस्थापक पदांसाठी पदवी आवश्यक आहे. मार्केटिंग आणि वित्त या विषयात पूर्णवेळ MBA आणि PGDM ला प्राधान्य दिले जाईल. उमेदवारांना पदानुसार संबंधित क्षेत्रात २ ते ५ वर्षांचा अनुभव असावा.
- वरिष्ठ व्यवस्थापक (क्रेडिट विश्लेषक, MSME रिलेशनशीप), व्यवस्थापक (क्रेडिट विश्लेषक) यांना पदवी आवश्यक आहे. एमबीए/ पीजीडीएम/ सीए/सीएफए/ सीएमए असलेल्यांना प्राधान्य दिले जाईल. या पदासाठी २ ते ८ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. उमेदवारांना अधिकृत भरती अधिसूचनेमध्ये पात्रतेबद्दल तपशील देखील मिळू शकतात.

## अर्ज कसा करावा?

प्रथम, बँकेच्या अधिकृत वेबसाइट, bankofbaroda.bank.in ला भेट द्या. जर तुम्ही नवीन वापरकर्ता असाल, तर नोंदणी बटणावर क्लिक करा आणि नंतर नवीन खाते तयार करा वर क्लिक करा. तुमचे नाव, मोबाईल नंबर, ईमेल आयडी आणि पत्ता यासारखी तुमची माहिती काळजीपूर्वक भरा. आता, तुम्ही तयार केलेल्या नोंदणी क्रमांकाचा वापर करून वेबसाइटवर लॉग इन करा. आता अर्ज फॉर्ममध्ये तुमची सर्व माहिती भरा. तुम्हाला तुमची शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि पत्ता यासह सर्व माहिती भरावी लागेल. डॉक्युमेंट अपलोड विभागात, तुमचा स्कॅन केलेला, रंगीत पासपोर्ट आकाराचा फोटो, स्वाक्षरी, शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक कागदपत्रे अपलोड करा. तुमच्या श्रेणीनुसार अर्ज शुल्क भरा आणि अंतिम सबमिट केलेल्या फॉर्मची प्रिंटआउट घ्या आणि ती सुरक्षित ठेवा. या भरतीशी संबंधित इतर कोणत्याही माहितीसाठी, उमेदवारांना बँक ऑफ बडोदाच्या अधिकृत वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

# दिवसा डॉक्टरी, रात्री UPSC ची तयारी... डॉ. अक्षिता पहिल्याच प्रयत्नात बनल्या IAS अधिकारी

**दिवसा वैद्यकीय सेवा द्यायची आणि रात्री अशा स्वप्नाचा पाठलाग करायची ज्यासाठी शिस्त, त्याग, संयम आणि अढळ विश्वास आवश्यक होता. डॉ. अक्षिता गुप्ताची कहाणी धैर्य आणि स्वप्नांना जगणे शिकवते. रुग्णालयात वैद्यकीय सेवा देत असताना ती यूपीएससीची तयारी करण्यासाठी थोडा वेळ काढायची. ब्रेक दरम्यानही ती तिच्या खिशातील नोट्स बाहेर काढायची... एके दिवशी तिचे स्वप्न पूर्ण झाले, जेव्हा तिने पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी परीक्षेत ६९ वा क्रमांक मिळवला. यशोगाथेत आयएएस अधिकारी अक्षिताने हे दाखवून दिले की जेव्हा तुम्ही उत्कटतेने आणि समर्पणाने काही करता, तेव्हा तुम्ही आव्हानांमध्येही पुढे जाऊ शकता हे जाणून घ्या...**

डॉ. अक्षिता गुप्ता हरियाणाच्या पंचकुलाची आहे. चंदीगड मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये एमबीबीएस करत असताना तिने यूपीएससीची तयारी सुरू केली. या काळात तिला जाणवले की तिला क्लिनिकल प्रॅक्टिसपासून दूर जायचे आहे आणि नागरी समस्यांकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पहायचे आहे.



## दिवसा डॉक्टर, रात्री स्वप्न...

कठीण वैद्यकीय शिक्षण घेत असतानाच तिला सिव्हिल सर्व्हिसेसची तयारी करण्याची प्रेरणा मिळाली. रुग्णालयातील कामाची धावपळ, रुग्णांच्या जबाबदाऱ्या आणि वैद्यकीय इंटर्नशिप दरम्यानच्या शिफ्ट्स असूनही, ती तिच्या प्रयत्नात स्थिर राहिली. दिवसा ती मेडिकल प्रॅक्टिस करायची आणि रात्री यूपीएससीची तयारी.

## पॉकेट नोट्स उपयोगी पडल्या

रुग्णालयातील लहान ब्रेकही ती वाया घालवत नव्हती. अभ्यासावर लक्ष केंद्रित करत असे. वेळ वाचवण्यासाठी ती आवश्यक पॉकेट नोट्स बाळगत असे. ती तिच्या पुस्तकांची पानेदेखील तिच्या खिशात ठेवत असे आणि जेव्हा जेव्हा तिला संधी मिळत असे तेव्हा ती लगेच अभ्यास सुरू करत असे. कधीकधी, अक्षिताच्या शिफ्ट १२ ते १४ तास चालायच्या, परंतु थकवा असूनही, तिने कधीही अभ्यास सोडला नाही.

## पहिल्याच प्रयत्नात 69 वा रँक

नोकरी न सोडता, शारीरिक थकवा आणि आव्हानांतून वावरत असतानाही तिने चिकाटी सोडली नाही. मार्ग कठीण होता पण अशक्य नव्हता. २०२० मध्ये तिने पहिल्याच प्रयत्नात ६९ वा अखिल भारतीय क्रमांक मिळवला आणि आयएएस अधिकारी बनली. आज ती पंजाब केडरची आयएएस अधिकारी म्हणून देशाची सेवा करते.



## वैद्यकीय पार्श्वभूमी बनली ताकद

अक्षिताने कधीही तिच्या वैद्यकीय पार्श्वभूमीला तिच्या तयारीत अडथळा मानले नाही आणि ती तिची सर्वात मोठी ताकद मानून पुढे सरकली. तिने वैद्यकीय विज्ञानाला तिचा पर्यायी विषय म्हणून निवडले आणि तिच्या अनुभवाचा योग्य दिशेने वापर करण्याचा विचार केला. रुग्णांची सेवा करताना तिला समाजाची जवळून समज मिळाली.

# युनिसेफमध्ये काम करण्याची ‘सुवर्ण संधी’, पेड इंटर्नशिपसाठी रिक्त जागा जाहीर; कुठे आणि कसा करायचा अर्ज, जाणून घ्या...

**युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंड (युनिसेफ) ही जगभरातील मुलांना मदत करणारी संस्था आहे. जवळजवळ प्रत्येक देशात कार्यरत असलेल्या या संस्थेला हजारो स्वयंसेवकांची आवश्यकता आहे. त्यामुळेच युनिसेफने आता पेड इंटर्नशिप प्रोग्रामसाठी रिक्त जागा जाहीर केल्या आहेत. अर्ज प्रक्रिया सुरू आहे. पदवीपूर्व, पदवीधारक, पदव्युत्तर विद्यार्थी, पीएचडी धारक विद्यार्थी या इंटर्नशिपसाठी अर्ज करू शकतात...**

युनिसेफसोबत काम करून इंटर्न्सना एवढी मोठी जागतिक संस्था कशी काम करते हे शिकता येईल. त्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळविण्यासाठी सिनियर प्रोफेशनल्ससोबत काम करण्याची संधी मिळेल. १९४६ मध्ये स्थापन झालेली युनिसेफ सध्या १९० देशांमध्ये कार्यरत आहे. तिचे ध्येय मुलांचे जीवन वाचवणे, त्यांचे आरोग्य, शिक्षण, पोषण, स्वच्छता आणि हिंसाचारापासून संरक्षण करणे आहे. ही संस्था जगातील सर्वात मोठी लस पुरवठादार देखील आहे.




- इंटर्नशिपचे काय फायदे आहेत? : युनिसेफ इंटर्नशिप ६ ते २६ आठवड्यांपर्यंत असते आणि ती पूर्णवेळ किंवा अर्धवेळ असू शकते. फायद्यांमध्ये दैनंदिन खर्च भागवण्यासाठी मासिक स्टायपेंड समाविष्ट आहे. इंटर्नशिपना प्रवास आणि व्हिसा खर्च भागवण्यासाठी एकरकमी रक्कम मिळेल. इंटर्नशिपना जागतिक विकास आणि मानवतावादी क्षेत्रात काम करण्याची संधी मिळेल. त्यांना अनुभवी प्रोफेशनल्सच्या मार्गदर्शनाखाली नेटवर्किंग आणि काम करण्याची संधी देखील मिळेल. इंटर्नशिपसाठी वय किमान १८ वर्षे असणे आवश्यक आहे.
- कुठे अर्ज करायचा? : युनिसेफमध्ये इंटर्नशिपसाठी अर्ज करण्यासाठी तुम्ही त्यांच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी. तुम्हाला ज्या इंटर्नशिपचा आनंद घ्यायचा आहे ती निवडा आणि नंतर अर्ज करा. तुम्हाला तुमचा सीव्ही आणि सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतील.



# बिझनेस



**चंदुभाई विराणी यांची कहाणी एखाद्या चित्रपटाच्या पटकथेपेक्षा कमी नाही. ते एकेकाळी फक्त ९० रुपये महिन्याला सिनेमा हॉल कॅन्टीनमध्ये काम करत होते. आज ते ५००० कोटी रुपयांच्या बालाजी वेफर्स साम्राज्याचे मालक आहेत. ही कथा त्यांच्या कठोर परिश्रम, दृढनिश्चय आणि सामान्य सुरुवातीपासून ते मोठ्या व्यवसाय उभारणीपर्यंतच्या प्रेरणादायी प्रवासाचे दर्शन घडवते.**

# फक्त 90 रुपयांत कॅन्टीनमध्ये काम करण्यापासून ते आता 5,000 कोटी रुपयांच्या साम्राज्याचे मालक होण्यापर्यंत... नशीब कसे बदलले?

- फक्त दहावीपर्यंत शिक्षण : चंदूभाई विराणींची कहाणी अनेकांसाठी प्रेरणास्रोत आहे. सामान्य परिस्थितीतून त्यांनी उदयास येऊन एक मोठा व्यवसाय उभारला. त्यांचे शिक्षण फक्त दहावीपर्यंत झालेले आहे. त्यांनी स्थापन केलेले बालाजी वेफर्स भारतातील आघाडीच्या स्नॅक ब्रँडपैकी एक आहे. सध्या या व्यवसायाची किंमत अंदाजे ५,००० कोटी आहे. यावरून हे सिद्ध होते की मोठ्या स्वप्नांसाठी मोठ्या सुरुवातीची आवश्यकता नसते.
- वयाच्या १५ व्या वर्षी सुरू केला व्यवसाय : १९७२ मध्ये वयाच्या १५ व्या वर्षी चंदूभाई विराणी त्यांच्या कुटुंबासह राजकोटपासून सुमारे ७९ किलोमीटर अंतरावर असलेल्या जामनगर जिल्ह्यातील धुंडोराजी येथे स्थलांतरित झाले. त्यांना मेघजीभाई आणि भिखुभाई असे दोन भाऊ होते. त्यांचे वडील दिवंगत पोपट विराणी यांनी त्यांची नापीक जमीन विकली आणि त्यांच्या मुलांना त्यांचे जीवन सुरू करण्यासाठी २०,००० रुपये दिले. या पैशाचा वापर करून भावांनी राजकोटमध्ये शेती उत्पादने आणि शेतीच्या उपकरणांचा व्यापार करून एक छोटासा व्यवसाय सुरू केला.
- व्यवसाय २ वर्षांतच अपयशी : दुर्दैवाने, हा उपक्रम दोन वर्षांतच अपयशी ठरला. स्थिर उत्पन्नाशिवाय जीवन अधिकाधिक कठीण होत गेले. भावांना त्यांना मिळेल ते काम शोधावे लागले. व्यवसाय कोसळल्यानंतर चंदूभाई आणि त्यांचे भाऊ राजकोटच्या सिनेमाच्या कॅन्टीनमध्ये काम करू लागले. चंदूभाई दरमहा फक्त ९० रुपये कमवत होते. ते दरवाज सांभाळण्यापासून ते पोस्टर चिकटवण्यापर्यंत आणि ग्राहकांना मार्गदर्शन करण्यापर्यंत सर्व काही करत असत. घराचे ५० रुपये भाडे भरण्यासाठीही त्यांच्याकडे पैसे नसायचे.
- संधीचे केले सोने... : सिनेमा कॅन्टीनमध्ये काम करत असताना चंदूभाईंना लक्षात आले की बटाट्याचे वेफर्स चित्रपट पाहणाऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. त्यांनी ही संधी ओळखली. त्यांनी सुमारे १०,००० रुपयांच्या गुंतवणुकीतून त्यांच्या अंगणात एक लहान शेड उभारला. त्यांनी त्यांच्या एका खोलीच्या घरात चिप्स बनवण्याचा प्रयोग सुरू केला. त्यांचे चिप्स लवकरच लोकप्रिय झाले, केवळ सिनेमा हॉलमध्येच नव्हे तर बाहेरही पसरले.
- ५० लाख रुपयांचे कर्ज घेतले... : मागणी वाढताच चंदूभाईंनी १९८९ मध्ये राजकोटच्या अजी जीआयडीसीमध्ये गुजरातमधील त्यावेळचा सर्वात मोठा बटाटा वेफर उत्पादन युनिट सुरू केला. त्यांनी ५० लाख रुपयांचे बँक कर्ज घेतले. १९९२ मध्ये, तिन्ही भावांनी अधिकृतपणे बालाजी वेफर्स प्रायव्हेट लिमिटेडची स्थापना केली. त्यांच्या खोलीत ठेवलेल्या भगवान हनुमानाच्या एका लहान मूर्तीवरून कंपनीचे नाव ठेवण्यात आले.
- आज एक वेगळी ओळख प्रस्थापित : आज, बालाजी वेफर्स हे भारतातील टॉप स्नॅक ब्रँडपैकी एक आहे. ते मोठ्या उत्पादन क्षमतेसह चार कारखाने चालवते. कंपनी दरवर्षी ६.५ दशलक्ष किलो बटाटे आणि १ कोटी किलो नमकीनवर प्रक्रिया करते. ते दर तासाला ३,४०० किलो चिप्सचे उत्पादन करते. भारताच्या ४३,८०० कोटी रुपयांच्या स्नॅक मार्केटमध्ये १२% वाटा असलेली, बालाजी वेफर्स ही देशातील तिसरी सर्वात मोठी स्नॅक कंपनी बनली आहे. कंपनीची उलाढाल हजारो कोटींवर पोहोचली आहे.

# गुगल मॅप्स... बुडणाऱ्या स्टार्टअपने कसे कमवायला सुरू केले 1,00, 00,00, 00,000...

**रस्त्यांवर आणि गल्ल्यांत मार्गदर्शन करणारे गुगल मॅप्स गेल्या ८ फेब्रुवारीला २१ वर्षांचे झाले. ते ८ फेब्रुवारी २००५ रोजी लाँच झाले होते. त्याची स्थापना लार्स आणि जेन्स रासमुसेन नावाच्या दोन भावांनी केली होती. या दोन भावांच्या या स्टार्टअपने चांगली कामगिरी केली नाही आणि तो बुडू लागला. गुगलचे संस्थापक लॅरी पेज त्यांच्या मदतीला धावले. त्यांची कंपनी गुगलने ते विकत घेतले आणि वेब ब्राउझरसाठी ते विकसित केले, त्याला गुगल मॅप्स असे नाव दिले. सुरुवातीला, ते फक्त एक डेस्कटॉप प्रोग्राम होते, परंतु उपग्रह तंत्रज्ञानामुळे नेव्हिगेशनचा मार्ग कायमचा बदलला. आज, ते आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनले आहे.**


- ऑस्ट्रेलियन कंपनीने केले लाँच : त्यावेळी MapQuest चे युग होते. त्यावेळी फक्त दिशानिर्देशांसह चौकोनी नकाशे मिळत होते. त्यानंतर, ऑस्ट्रेलियन स्टार्टअप कंपनी Where2 ने स्क्रीनच्या मध्यभागी नकाशा ठेवण्याचा विचार केला. लोक नकाशा फिरवून पाहू शकत होते, की ते कुठे आहेत... आज हे छान वाटते, परंतु त्यावेळी कोणालाही ते आवडले नाही... Sequoia Capitalने Where2 मध्ये गुंतवणूक केली. पण नंतर त्यांनी त्यांचे निधी काढून घेतले. ज्यामुळे Where2 ला रातोरात निधी गमवावा लागला. मात्र हे करताना Sequoia Capitalने गुगल संस्थापक लॅरी पेजची भेट Where2 च्या संस्थापकांशी घालून दिली. Where2 चे तंत्रज्ञान सुरुवातीला एक्सपिडिशन नावाचे डेस्कटॉप ॲप म्हणून सुरू झाले होते. त्यासाठी डाउनलोडची आवश्यकता होती, परंतु लॅरी पेजला ते आवडले नाही. तो म्हणाला, आम्हाला वेब आवडते आणि त्याचे ॲप ब्राउझरमध्ये बिल्ट करण्यासाठी एक अंतिम मुदत निश्चित केली.
- लाँच होण्याच्या एक दिवस आधी लीक... : युझर्सना ते सोपे करण्यासाठी अनेक बदल करण्यात आले. गुगल मॅप्स अधिकृत लाँच होण्याच्या एक दिवस आधी ७ फेब्रुवारी २००५ रोजी लीक झाले. ड्रॅग करण्यायोग्य नकाशे आणि डिझाइन पाहून लोक आश्चर्यचकित झाले. तथापि, सुरुवातीच्या १ कोटी व्ह्यूजनंतर, त्याचा वापर कमी झाला. नंतर, गुगलने हळूहळू त्याचे डेव्हलपर टूल्स रिलीज केले आणि एक फिचर्स लाँच केले ज्यामुळे लोकांना गुगल मॅप्समध्ये त्यांचे घर शोधता आले. गुगल मॅप्सचे हे वैशिष्ट्य प्रचंड लोकप्रिय झाले. एक वर्षानंतर २००६ मध्ये गुगल मॅप्स जगातील सर्वात मोठे मॅप प्रदाता बनले. आज गुगल मॅप्स स्मार्टफोनवर सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या ॲप्सपैकी एक आहे.
- किती महसूल आणि तो कसा कमावला जातो? : आज गुगल मॅप्स ही पालक कंपनी अल्फाबेटसाठी एक मुख्य साधन आहे. दरवर्षी तिचा महसूल वाढत आहे. मीडिया रिपोर्टनुसार, २०१९ मध्ये त्याचे उत्पन्न ३ अब्ज अमेरिकन डॉलर्स होते, परंतु २०२३ पर्यंत ते अंदाजे ११.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स (१ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त) पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. यावरून असे दिसून येते की लोक आता गुगल मॅप्सला फक्त नेव्हिगेशन ॲपपेक्षा जास्त मानतात. ते स्थान-आधारित सेवांसाठी एक प्रमुख व्यासपीठ बनले आहे. गुगल मॅप्सवर अनेक प्रकारच्या जाहिराती प्रदर्शित केल्या जातात आणि डेव्हलपर्सना प्रीमियम API वापरण्यासाठी पैसे द्यावे लागतात. गुगल मॅप्सच्या एकूण उत्पन्नापैकी किमान ८२% जाहिरातींमधून येतात. गुगल मॅप्सच्या उत्पन्नाचा मोठा भाग नेव्हिगेशनमधून येतो. गुगल मॅप्स नेव्हिगेशन वापरणाऱ्या व्यवसायांना शुल्क आकारते. कंपन्या गुगल मॅप्सवर त्यांची दुकाने, रेस्टॉरंट्स किंवा सेवा केंद्रे प्रमोट करण्यासाठी गुगलला पैसे देतात. गुगल मॅप्स प्रमोटेड पिन आणि वैयक्तिकृत जाहिरातींद्वारे देखील महसूल निर्माण करते. उदाहरणार्थ, जर तुम्ही गुगल मॅप्सवर माझ्याजवळील सर्वोत्तम कॉफी शॉप्स शोधले तर गुगल मॅप्स प्रथम प्रमोट केलेले रेस्टॉरंट प्रदर्शित करते. यासाठी ते कंपन्यांना शुल्क

## हे ॲप टॉप 3 मध्ये

जुलै २०२४ मध्ये जगभरात सर्वाधिक डाउनलोड केलेल्या गुगल ॲप्समध्ये गुगल मॅप्स तिसऱ्या क्रमांकावर होते, अंदाजे १२ दशलक्ष डाउनलोड्स होते. २०२३ मध्ये, गुगल मॅप्स हे युनायटेड स्टेट्समध्ये सर्वाधिक डाउनलोड केलेले नेव्हिगेशन ॲप होते, ज्याचे १० दशलक्षाहून अधिक डाउनलोड्स होते, तर वेझ ९.८९ दशलक्ष डाउनलोड्ससह दुसऱ्या क्रमांकावर होते.

## मल्टीपल प्लॅटफॉर्म्सकडून स्पर्धा

आज डिजिटल मॅपिंग क्षेत्रात अनेक प्लॅटफॉर्म गुगल मॅप्सशी स्पर्धा करत आहेत. यामध्ये वेझ, ॲपल मॅप्स, HERE WeGo, OpenStreetMap, TomTom, Mapbox, MapQuest आणि MapmyIndia/ Mappls यांचा समावेश आहे. वेझ हे गुगलच्या मालकीचे आहे परंतु ते स्वतंत्रपणे काम करते. हे रिअल-टाइम, वापरकर्त्याने गोळा केलेला ट्रॅफिक डेटा, अलर्ट आणि इतर माहिती प्रदान करणारे एक आघाडीचे ॲप आहे. भारतात, बरेच लोक गुगल मॅप्स व्यतिरिक्त मॅपमाय इंडिया वापरतात.



# आगामी काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर -मुख्यमंत्री फडणवीस



नागपूर(प्रतिनिधी) -येत्या काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर राहणार आहे. यासाठी आम्ही अनेक धोरणे आखली असली, तरी काही धोरणे जुनी झाली असल्याने भविष्यातील गरजा, बदल आणि आव्हाने लक्षात घेऊन येत्या दोन-तीन महिन्यात विविध क्षेत्रांतील भविष्योन्मुख (फ्युचर रेडी पॉलिसी) धोरणे आणली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटद्वारे आयोजित ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी इंटरनॅशनल बिझनेस कॉनक्लेव्हचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी, असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांच्यासह तब्बल २२ देशांचे राजदूत, उच्चायुक्त व बिझनेस प्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे याच परिषदेत गुंतवणुकीचे तीन सामंजस्य करारही पार पाडण्यात आले.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सध्या वेगाने विकसित होणारे राज्य आहे. त्यातल्या त्यात विदर्भाचा प्रदेश झपाट्याने विकसित होत आहे. महाराष्ट्रात सामंजस्य करार केवळ कागदावर होत नसून ते प्रत्यक्षात साकारले जात आहेत. लॉजिस्टिक्स, एआय, सोलर क्षेत्रामध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. सर्वाधिक विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे. राज्य सरकारने गेल्या काही महिन्यांमध्ये जीसीसी पॉलिसी, जेम्स अँड ज्वेलरी पॉलिसी, बांबू पॉलिसी जाहीर केली आहे. नवे औद्योगिक धोरण आले आहे.

यात भर घालून सात नवीन धोरणांची घोषणा येत्या दोन-तीन महिन्यांत होणार आहे. यामध्ये टेक्सटाइल्स अँड ॲपरल, लेदर अँड फुटवेअर, इलेक्ट्रॉनिक्स अँड फॅब, एरोस्पेस अँड डीफेन्स, एमएसएमई, फार्मास्युटिकल बायोटेक अँड मेडिकल डीव्हायसेस, सर्क्युलर इकॉनॉमी, बायो प्लास्टिक या क्षेत्रांतील धोरणांचा समावेश असेल. या सातही धोरणांच्या निर्मितीचे काम सुरू असून येत्या तीन महिन्यांत ते जाहीर करण्यात येतील. यामुळे धोरणप्रेरित गुंतवणूक, उद्योगवाढ आणि आर्थिक विकास हेच महाराष्ट्राचं प्रमुख सूत्र ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सोलर मॉड्यूलच्या क्षेत्रात नागपूर क्षेत्रात येणारी गुंतवणूक ही देशातील सर्वात मोठी सोलर मॉड्यूल प्रोड्युसिंग इकोसिस्टीम असून अद्यापही गुंतवणुकीचा ओघ मोठ्या प्रमाणात सुरुच आहे. कृषी प्रक्रियेसह अनेक निर्मितीक्षम क्षेत्रात नागपूर आणि विदर्भाची मोठ्या प्रमाणात आगेकूच सुरु आहे, अनेक क्षेत्रात गुंतवणुकीच्या नव्या संधी येत आहेत. अगदी गडचिरोलीसारख्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित होत असून भारताचे स्टील हब म्हणून ते पुढे येत आहे. पुढील दहा वर्षांत गडचिरोलीत पोलादनिर्मितीची सर्वाधिक मोठी क्षमता उभी राहणार आहे. एवढेच नाही, तर गडचिरोलीला पर्यावरणपूरक 'ग्रीन स्टील' हब म्हणून विकसित करण्याच्या दिशेनेही आम्ही ठोस पावले उचलत असल्याचे त्यांनी सांगितले.

अदानी समूहाकडून काल कोल गॅसीफिकेशनच्या क्षेत्रात मोठी गुंतवणुक झाली आहे. देशातील अशा स्वरुपाच्या पहिल्याच गुंतवणुकीमुळे विदर्भातील कोल इकोसिस्टीमचे चित्र संपूर्णपणे बदलणार आहे. ईलेक्ट्रीक व्हेईकल्सच्या क्षेत्रात पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरमध्ये सर्वात मोठी गुंतवणूक येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी प्रास्ताविकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात विदर्भाचा झपाट्याने विकास होत असल्याचे सांगितले. ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमने १५० देशांसोबत करार केला असून त्याचा लाभ विदर्भातील एमएसएमईंना स्वत:चा व्यवसाय वाढविण्यासाठी होणार असल्याची माहिती ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी यांनी दिली.

ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी तीन महत्त्वाचे सामंजस्य करार झालेत. यामध्ये पहिला करार महामेट्रो आणि केअर हॉस्पिटलमध्ये झाला. यात कस्तुरचंद पार्कजवळ महामेट्रोच्या जागेवर पीपीपी मॉडेलवर आधारित सुमारे साडेतीनशे खाटांच्या बहुविशेषोपचार हॉस्पिटलचा समावेश असून त्यासाठी सुमारे सहाशे कोटींची गुंतवणूक होत आहे. या प्रकल्पातून सुमारे पंधराशे ते अठराशे रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे.

# पुणे विमानतळावरील रनवेवर चक्क कुत्र्यांचा वावर; प्रवाशाने मोबाईल कॅमेरामध्ये कैद केला व्हीडीओ

पुणे (प्रतिनिधी)- अलीकडेच बारामती विमान अपघाताची घटना ताजी असतानाच पुणे विमानतळावरील रनवेवर चक्क कुत्र्यांचा वावर असल्याचं समोर आलं आहे. शनिवारी सात वाजून ४० मिनिटांनी पुणे विमानतळाच्या रनवेवर चक्क कुत्र्याचा वावर दिसून आलाय. पुण्यावरून फ्लाय ९९ फ्लाईटने जळगावला येणाऱ्या देवेश लोखंडकार या खामगाव येथील प्रवाशाने आपल्या मोबाईल कॅमेऱ्यामध्ये हा व्हिडिओ कैद केला आहे. यात पुणे विमानतळावरील धावपट्टीवर चक्क कुत्रा फिरताना मोबाईल कॅमेऱ्यात कैद झालाय. विशेष म्हणजे पुणे विमानतळ हे वायुसेनेकडून संचालित करण्यात येतं. यामुळे विमानतळावरील सुरक्षा व्यवस्थेत किती मोठा हलगर्जीपणा आहे, हे समोर येत आहे. हा व्हीडीओ त्यांनी एबीपी माझा साठी पाठवला आहे. त्यामुळे आता विमानतळावरील सुरक्षेचा मुद्दा चर्चेत आला आहे.

नुकतंच राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा अपघात होऊन त्यांचासह विमानातील पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झालाय. या घटनेनं अवघा देश हादरला आहे. अशातच या विमान अपघाताबाबत आता अनेक प्रश्न आणि शंका उपस्थित होत आहे. तर दुसरीकडे हि घटना ताजी असताना पुणे विमानतळावरील रनवेवर चक्क कुत्र्यांचा वावर आढळून आलाय. एका प्रवाशाने आपल्या मोबाईल कॅमेरामध्ये हा प्रकार कैद केला आहे. त्यामुळे उद्या कुठलाही अनुचित प्रकार घडला तर याला जबाबदार कोण? असा प्रश्नही या निमित्याने विचारला जाऊ लागला आहे. त्यामुळे या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे काळाची गरज असल्याचेही बोललं जात आहे.

दरम्यान, राज्यातील काही राजकीय नेत्यांनी या विमान अपघाताबाबत संशय व्यक्त केल्याने, त्या अनुषंगानेही सीआयडी अधिकारी विविध शक्यतांचा तपास करत असल्याची माहिती आहे. त्यामुळे ही चौकशी केवळ तांत्रिक बाबींपुरती मर्यादित न राहता, सर्व अंगांनी करण्यात येत आहे. अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास तीन टप्प्यांमध्ये केला जाणार असल्याचे यापूर्वीच जाहीर करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात विमानाचा वेग, उंची, इंजिनाचे तापमान, हवेचा दाब, पंखांची हालचाल, तसेच पायलटमधील संवाद यासारखी तांत्रिक माहिती संकलित केली जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात विमानाचे अवशेष प्रयोगशाळेत पाठवून त्यांचे सखोल विश्लेषण करण्यात येणार आहे. यामध्ये विमान जमिनीवर आदळल्यानंतर झालेला परिणाम, विमानाला आग कधी व कशी लागली,

# अजित पवारांच्या निधनामुळे बारामतीकरांनी मतदानाकडे पाठ फिरवली? पुणे जिल्ह्यातील सर्वात कमी मतदान

मुंबई(प्रतिनिधी) -राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी शनिवारी पार पडलेल्या मतदानाला भरभरुन प्रतिसाद मिळाला. अनेक गावांमध्ये मतदान केंद्रांबाहेर लांब रांगा लागल्याचे चित्र दिसत होते. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी सरासरी ७० टक्के मतदान झाले. मात्र, पवार कुटुंबियांचा बालेकिल्ला असणाऱ्या बारामतीमध्ये अजित पवार यांच्या निधनानंतर मतदारांनी जिल्हा परिषद निवडणुकीच्या मतदानाकडे साफ पाठ फिरवल्याचे दिसले.

पुणे जिल्ह्यातील सर्वात कमी मतदान बारामती तालुक्यात झाले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात अजितदादांच्या निधनानंतर बारामतीकरांनी मतदान करणं टाळल्याची चर्चा आहे. अजित पवार हे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचारासाठी बारामती येथे येत असताना २८ जानेवारीला त्यांचे विमान कोसळले होते. या अपघाता-मध्ये अजित पवार यांचा मृत्यू झाला



होता. त्यामुळे यंदाच्या बारामती जिल्हा परिषदेच्या निवडणुकीवर दुःखाचे सावट होते. काल बारामती-मध्ये पवार कुटुंबीयांनी आवर्जून मतदान केले होते. मात्र, बारामतीमधील सामान्य मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवल्याचे दिसले. बारामतीमध्ये जिल्हा परिषद निवडणुकीसाठी अवघे ५४ टक्के मतदान झाले आहे. तर पुणे जिल्ह्यात सरासरी ६९ टक्के मतदान झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. पुणे जिल्ह्यातील वेल्हे याठिकाणी सर्वाधिक ७९ टक्के मतदान झाले.

**पुणे जिल्ह्यात सरासरी झालेल्या मतदानाची आकडेवारी (सरासरी)**

जुन्नर: ६१.१८ टक्के, आंबेगाव: ६५.३० टक्के, शिरूर: ७५.६९ टक्के, खेड: ७५.४६ टक्के, मावळ: ७७.४३ टक्के, मुळशी: ६३.७९ टक्के, हवेली: ६८.०२ टक्के, दौंड: ६५ टक्के, पुरंदर: ६८.३७ टक्के, वेल्हे: ७९.३० टक्के, भोर: ७५.६२ टक्के, बारामती: ५४.९० टक्के, इंदापूर: ६५.६७ टक्के

**सुनेत्रा पवारांनी मानले मतदारांचे आभार**

जिल्हा परिषद निवडणुकीचे मतदान संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मतदारांचे आभार मानले आहेत. त्यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत मतदान करणाऱ्या मतदारांचे सुनेत्रा पवार यांनी आभार मानले आहेत. अजितदादांचे विचार व कार्य अधिक सक्षमपणे पुढे जात असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# अनाथाश्रमात राहिलेला मुलगा झाला नेदरलँडचा महापौर

## आईला शोधत ४० वर्षांनी नागपूरला आला





नागपूर (प्रतिनिधी) -नेदरलँड्समधील हीमस्टेडचे महापौर फाल्गुन बिनेन्डिज्क तब्बल ४० वर्षांनंतर जन्मदात्या आईचा शोध घेत नागपूरमध्ये पोहोचले आहेत. फाल्गुन बिनेन्डिज्क यांचा जन्म १० फेब्रुवारी १९८५ रोजी नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये झाला. त्यांची आई त्यावेळी फक्त २१ वर्षांची आणि अविवाहित होती. सामाजिक कलंक आणि बदनामीच्या भीतीने या मातेने तीन दिवसांचा मुलगा नागपूरच्या मातृसेवा संघाला सोपवला. यथावकाश एका डच दांपत्याने या मुलाला दत्तक घेतले. ते मुलाला घेऊन नेदरलँडला गेले. तिथेच मुलाचं शिक्षण आणि पुढील कारकिर्द घडली. नेदरलँड्समध्ये यशस्वी जीवन जगून आणि राजकीय मान्यता मिळवूनही, फाल्गुनला त्याच्या जन्मदात्या आईविषयी प्रचंड ओढ आहे. याच कारणामुळे फाल्गुनने त्याच्या मुलीचे नाव आईच्याच नावावरून ठेवले. आता फाल्गुन नागपूरमध्ये आईचाला भेटण्यासाठी आला आहे. फाल्गुन आतापर्यंत दोन वेळा भारतात आला आहे. ही त्याची तिसरी भारत भेट आहे. याआधी २०१७ आणि २०२४ मध्ये फाल्गुन भारतात आईचा शोध घेण्यासाठी आला होता. तो तो मातृसेवा संघाच्या माजी अधीक्षक मंगला भुसारी यांनाही भेटला. तब्बल ४० वर्षांपूर्वी मंगला भुसारी यांनीच अनाथ मुलाचे नाव फाल्गुन ठेवले होते. ज्या महिलेने त्याचे नाव ठेवले होते तिला भेटणे फाल्गुनसाठी खूप भावनिक होते, जरी त्याची आई कुठे आहे हे अजूनही एक रहस्य आहे. मातृसेवा संघाच्या रजिस्टरमध्ये फाल्गुनची अचूक जन्मतारीख आणि आईच्या नावाचा उल्लेख आहे. पण त्यावेळी फाल्गुनच्या आईने सामाजिक भितीपोटी घराचा पत्ती व्यवस्थित दिलेला नाही. नागपूर जिल्हा दंडाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि महिला आणि बाल कल्याण विभागाचे पथक जुने रुग्णालय आणि नागरी संस्थांच्या नोंदींची तपासणी करत आहेत.


विशेष दिवाणी दावा क्रं ६०/२०१६
अवतारसिंग वि. कुलदिपसँग
निशाणी क्रं.

आज दि ०२.९.२०२३ रोजी मा. एस. ए. खलाने, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नांदेड यांच्या न्यायालयात वादी तर्फे वकील, एस. बी. चौधरी हजर प्रतिवादी तर्फे वकील सुखमनी जसपालसिंग हजर विधीज्ञांच्या अंतिम युक्तीवादानंतर न्यायनिर्णयात खालीलप्रमाणे आदेश पारीत झाला.

ORDER

1. Suit is partly decreed with costs.
2. The plaintiff and defendant are having V1D2 share each in the suit property that is Municipal House No. 3-3-306/1 (old), New Municipal House No. 3- 3-144/2 part of plot No. 2, part and parcel of CTS No. 2838, dm. 247.9 Sq Mtrs., including the construction thereon to the extent of near about 1266 Sq. Feet situated at Kankayya Compound Gunidwara Gate No. 2, Nanded.
3. The plaintiff and the defendant be handed over their separate shares as above.
4. Preliminary decree in view of Order 20 Rule 12 be prepared.

( Dictated and pronounced in open Court )
Place- Nanded.
Date-02-09-2023

S/-
(S.A. Khalane)
Jt. Civil Judge Sr. Div., Nanded


## पुण्याच्या आरुषची गगनभरारी, १० व्या वर्षी अवकाशाला गवसणी

पुणे(प्रतिनिधी)-हल्लीची मुलं ही मुळातच हुशार असतात. लहानग्या वयातच



त्यांचा पंखात असणारं बळ हे प्रचंड असतं. थोडक्यात काय तर जिद्द ही अमाप असते. अश्याच एका मेहनती जिद्दी पुण्याच्या आरुष जोशी याने वयाच्या १० व्या वर्षी अवकाशाला गवसणी घातली आहे.

खेळण्याबागडण्याच्या वयात आरुषने टेलिस्कोपचं खेळणं हातात धरत चक्क दोन लघुग्रहांचा शोध लावला आहे. सध्या पाचवीत असणाऱ्या आरुषने मंगळ आणि गुरु या ग्रहांच्या दरम्यान असलेल्या दोन छोट्या लघुग्रहांचा शोध लावला. आरुषला लहानपणापासूनच अंतराळाचे आकर्षण होते. जसा मोठा होत गेला तसं अंतराळाविषयीचे त्याचे वाचन वाढत गेले, तो अंतराळाशी संबंधित अधिकाधिक माहिती शोधू लागल. व्हिडीओ बघू लागला. याच सगळ्यातून त्याची कल्पनाशक्ती बहरत गेली. त्याला अंतराळाविषयी सखोल अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली.

# मंकी फिव्हरवर स्वदेशी लस विकसित; महाराष्ट्रातील दुर्गम भागातील नागरिकांना दिलासा

नवी दिल्ली : महाराष्ट्र,कर्नाटक आणि गोवा यांसह संपूर्ण पश्चिम घाट पट्ट्यात दरवर्षी दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या 'क्सानूर फॉरेस्ट डिसीज' अर्थात 'मंकी फिव्हर'वर भारतीय संशोधकांनी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. भारतीय आयुर्विज्ञान संशोधन परिषदेने या गंभीर आजारावर पूर्णतः स्वदेशी बनावटीची, सुधारित आणि अधिक प्रभावी लस विकसित केली असून, या लसीच्या मानवी वैद्यकीय चाचणीच्या पहिल्या टप्प्याला आता अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. या संशोधनामुळे विशेषतः महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील दुर्गम भागात राहणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

क्सानूर फॉरेस्ट डिसीज हा प्रामुख्याने 'टिक-बॉर्न' म्हणजेच गोचीडजन्य विषाणूमुळे होणारा आजार आहे. १९५७ मध्ये कर्नाटकच्या क्सानूर जंगलात या विषाणूचा पहिला रुग्ण सापडला होता, म्हणून याला ' केएफडी' असे नाव पडले. हा विषाणू प्रामुख्याने 'हेमाफिसालिस स्पिनिगेरा' या प्रकारच्या गोचिडांमार्फत पसरतो. हे गोचीड बाधित माकडे आणि उंदरांना चावल्यानंतर जेव्हा मानवाला चावतात, तेव्हा या विषाणूचा संसर्ग होतो. माकडांच्या मृत्यूशी या आजाराचा थेट संबंध असल्याने याला स्थानिक भाषेत 'मंकी फिव्हर' किंवा 'मंकी डिसीज' म्हटले जाते. या आजारात अचानक तीव्र ताप येणे, उलट्या, जुलाब आणि गंभीर प्रकरणांमध्ये शरीरातून रक्तस्राव होणे अशी लक्षणे दिसतात. धक्कादायक बाब





म्हणजे, बाधित रुग्णांपैकी ५ ते १० टक्के रुग्णांचा यात मृत्यू होतो आणि यावर अद्याप कोणताही ठोस औषधी उपचार उपलब्ध नाही.

महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये काम करणारे वन कर्मचारी, शेतकरी आणि लाकूडतोडे यांना या आजाराचा सर्वाधिक धोका असतो. उन्हाळ्याच्या सुरुवातीला, म्हणजेच जानेवारी ते एप्रिल या काळात या आजाराचा प्रादुर्भाव शिखरावर असतो. या पार्श्वभूमीवर, आयसीएमआरच्या अखत्यारीतील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था आणि भारतीय रोगप्रतिकारशास्त्र संस्था यांनी संयुक्तपणे ही 'ॲडज्युव्हांटेड इनएक्टिव्हेटेड' लस विकसित केली आहे. ही लस शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती अधिक सक्षमपणे जागृत करण्यास मदत करते. ही दोन मात्रांची लस असून, २८ दिवसांच्या अंतराने तिचे दोन डोस दिले जातील.

# ओबीसींचे १७ फेब्रुवारीला नागपुरात आंदोलन: जातीनिहाय जनगणना आणि यूजीसीच्या नव्या धोरणांविरोधात आक्रमक

नागपूर (प्रतिनिधी)-नागपुरात सकल ओबीसी महामोर्चाच्या वतीने आयोजित बैठकीत ओबीसींच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर मंथन करण्यात आले असून, या बैठकीत १७ फेब्रुवारी रोजी नागपुरात भव्य आंदोलन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार आणि यूजीसीचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक पार पडली.

या बैठकीत विदर्भातील प्रमुख ओबीसी संघटनांनी जातीनिहाय जनगणनेतील तांत्रिक त्रुटींवर तीव्र असंतोष व्यक्त केला. प्रामुख्याने घरसूची प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १२ मध्ये ओबीसींचा स्पष्ट उल्लेख नसल्याने समाजाच्या घटनात्मक हक्कांवर भविष्यात गदा येण्याची शक्यता बैठकीत वर्तवण्यात आली. यासोबतच यूजीसीच्या नव्या धोरणांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली असून, या सर्व तांत्रिक आणि धोरणात्मक त्रुटींच्या निषेधार्थ १७ फेब्रुवारीला आंदोलनाचा एल्गार पुकारला जाणार आहे.

या बैठकीनंतर विजय वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, जनगणनेच्या संदर्भात तसेच यूजीसीच्या संदर्भात आमच्यात चर्चा झाली. ओबीसीची जनगणना होणार नसेल तर हे अन्यायकारक आहे. सरकारकच्या दरवाजात या सगळ्याच्या विरोधात १७ तारखेला आम्ही संविधान चौकातून धरणे आंदोलन सुरू करणार आहोत. या जनगणनेमध्ये जोपर्यंत ओबीसीचा समावेश होत नाही, तोपर्यंत मोठे आंदोलन या देशात उभारले जाणार आहे. या पलीकडे जाऊन ओबीसी संमेलन देखील आम्ही आयोजित करणार आहोत.

पुढे बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले, या आंदोलनात मोठ्या संख्येने येतील. १७ तारखेपासून ही सुरुवात होणार आहे. ज्यांना ज्यांना यायचे आहे ते येतील. याला राजकीय स्वरूप देता येणार नाही. ओबीसीच्या हक्कासाठी तिथे यायचे आहे. कुठल्याही राजकीय बॅनरखाली हे आंदोलन नाही. ओबीसीच्या हक्काचे मिळाले तर त्यांचे जे आताचे प्रश्न आहेत, ते सगळे प्रश्न दूर होतील.


## टी. सी. हरवली

माझी महानंदा जळबाजी सिरसाट या नावाची इयत्ता बारावी पासची टी. सी. व अन्य शैक्षणिक कागदपत्रे देगलूर ते नांदेड दरम्यान प्रवासात हरवले आहेत. ज्यांना कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता:- जळबाजी तुकाराम सिरसाट मु.पो. कापसी (बु) ता. लोहा, जि.नांदेड. मो. +९१९९२३२९९७०७.



## जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

क्रमांक २०२५-आरबी-१-डेस्क-२-टे-५/१-RONOC-प्र.क्र.-१८

जाहीर प्रगटन

(एक्सप्लोझीव नियम, २००८ चे कलम १०३ (३) (ए) नुसार)

विषय:-नियोजित नगर भूमापन क्रं. १२१२३ मौजे नांदेड ता. जि. नांदेड येथे नवीन रिटेल आऊटलेटसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणे बाबत

संदर्भ-प्रदेश व्यवस्थापक (किरकोळ), भारत पेट्रोलियम कॉ. लि. अकोला यांचे पत्र ART.NOC.23-24.VASARNI, दिनांक ०४.०१.२०२५

प्रदेश व्यवस्थापक (किरकोळ), भारत पेट्रोलियम कॉ. लि. अकोला यांनी मौजे नांदेड ता. जि. नांदेड येथील नगर भूमापन क्र. १२१२३ मध्ये नवीन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. प्रस्तुत ठिकाणी रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी कंपनीने अब्दुल बारी आदिल अ. वाहिद अब्दुल, रा. घर. क्र.९-४-२१४, अलीनगर इतवारा नांदेड ता. जि. नांदेड यांना डिलरशिप दिलेली आहे.

सदरील पेट्रोलपंप उभारायचा भूखंड नगर भूमापन क्र १२१२३ (खंड क्र.७४४७/२०१४, ५८३८/२०२४, ५८४०/२०२४, ५८४१/२०२४) मौजे नांदेड ता. जि. नांदेड हा अब्दुल बारी आदिल अ. वाहिद अब्दुल यांच्या मालकीचा आहे.

सबब, उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित जागेत भारत पेट्रोलियम कॉ. लि. अकोला यांना नवीन रिटेल आऊटलेट (पेट्रोलपंप) उभारण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड येथे हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाचे आत लेखी आक्षेप/हरकती कार्यालयीन वेळात समक्ष सादर कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

मुदतीत प्राप्त आक्षेप/हरकती सुनावणी घेऊन अंतिम करण्यात येतील याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

Digitally signed by Shinde Ajay Dattatraya
Date: 03-02-2026 18:50:59

अपर जिल्हादंडाधिकारी, नांदेड



## Change In Name

I, Damanpreet Kaur, wife of Gurujyot Singh Jolly, resident of Sukh Sahak Guru Teg Bahadur Nagar, Bhagat Singh Road, Nanded – 431601, Maharashtra, India, do hereby solemnly affirm and declare that my name has been changed:

From: Damanpreet Kaur Roshan Singh Granthi To: Damanpreet Kaur Gurujyot Singh Jolly The above change of name is made after my marriage and for all official, legal, and passport purposes. Henceforth, I shall be known and identified by my new name Damanpreet Kaur Gurujyot Singh Jolly for all records, documents, and future correspondence.

I request all concerned authorities and individuals to kindly take note of the same.



## नाव बदल जाहीरनामा

मी, दमनप्रीत कौर, पत्नी गुरुज्योत सिंग जॉली, राहणार सुख सहाक गुरु तेग बहादूर नगर, भगतसिंग रोड, नांदेड ४३१६०१, महाराष्ट्र, भारत, याद्वारे जाहीर करते की माझे नाव खालीलप्रमाणे बदलण्यात आले आहे: जुने नाव: दमनप्रीत कौर रोशन सिंग ग्रंथी

नवे नाव: दमनप्रीत कौर गुरुज्योत सिंग जॉली

वरील नाव बदल विवाहानंतर करण्यात आला असून तो सर्व शासकीय, कायदेशीर व पासपोर्ट संबंधित कामांसाठी लागू आहे. यापुढे माझे सर्व व्यवहार, नोंदी व कागदपत्रे दमनप्रीत कौर गुरुज्योत सिंग जॉली या नावानेच असतील. सर्व संबंधित अधिकारी व व्यक्तींनी याची नोंद घ्यावी, ही विनंती.



## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.

इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

-: संपर्क पत्ता :-
उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,
सिडको एम.आय.डी.सी. नांदेड
मो.नं. ९९६०१२८१९१



## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ८७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




# विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच खेळाला महत्त्व दिल्यास मानसिक विकासाला मदत -आ. प्रतापराव चिखलीकर



**लोहा (प्रतिनिधी) –** विद्यार्थी जीवनामध्ये शिक्षणाएवढेच खेळाला महत्व देणे ही काळाची गरज झाली असून, विद्यार्थ्यांचे मानसिक बल वाढवायचे असेल तर शिक्षणा-बरोबरच खेळाला महत्व देणे गरजेचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा मानसिक विकास होण्यास मदत होते. अनेक विद्यार्थी खेळामध्ये रुची घेऊन आपले नावलौकीक करू शकतात, अशी अनेक उदाहरणे समाजामध्ये आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनो, खेळायला महत्त्व द्या, आणि पालकांनी सुद्धा त्यामध्ये सहकार्य करावे, असे आवाहन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

लोहा तालुक्यातील धावरी येथील नंदीकेश्वर माध्यमिक विद्यालयात गुणवंत विद्यार्थी सन्मान सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी अनेक कलेच्या माध्यमातून आपल्या अंगी असलेला कलेचा आविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केला. या कार्यक्रमाचे उद्घाटन लोहा-कंधारचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सौ. प्रणितातार्ई देवरे चिखलीकर, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पा. पवार, उपनगराध्यक्ष करीम भाई, गटनेते भास्कर पा. पवार, नगरसेवक सदानंद तेलंग, मारुती जंगले, सतीश निखाते, तुकाराम दाढेल, अविनाश पवार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे, माणिकराव पाटील वाकडे, सोपानराव मोरे, अभंग पाटील गाडेकर, चेअरमन शंकर पाटील काळे, माजी सभापती दिलीप पाटील गाडेकर, संग्राम पाटील गाडेकर, रुक्माजी पाटील पवार, तंटामुक्ती अध्यक्ष चंद्रहार पाटील वाकडे, कोंडीबा पाटील गायकवाड, भानुदास कागणे, शिवसेनेचे तालुका उपप्रमुख मारुती एजगे, राहुल पाटील बोरगावकर, शिक्षण विस्तार अधिकारी विठ्ठल आचने, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बी. वाय. चव्हाण, युनूस शेख यांच्यासह गावातील व परिसरातील महिला, भगिनी पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार प्रताप पाटील चिखलीकर पुढे म्हणाले की नंदिकेश्वर माध्यमिक विद्यालय धावरीची शाळा ही तालुक्यात शैक्षणिकदृष्ट्या पुढाकार घेत आहे. अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करत असताना सन २०२४ - २५ या वर्षांमध्ये तब्बल २० विद्यार्थी हे कर्मचारी झाले आहेत. त्यामुळे गुणवत्तेचा आलेख चांगला वाढत आहे. शाळेला चांगली इमारत आणि भव्य असे मैदान आहे. त्या मैदानाचा उपयोग करून विद्यार्थ्यांनी खेळामध्ये सक्रिय होऊन विविध भरतीसाठी प्रयत्न करावे. त्याला लागणाऱ्या सर्व साहित्याची उपलब्धता स्वतः करून देईल असेही ते म्हणाले.

विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये खेळाला महत्त्व देणे ही काळाची गरज आहे. तालुक्यातील युवकांनी मैदानी खेळात व पोलीस भरती, सैनिक भरतीमध्ये आपल्या तालुक्याचे व आपल्या गावचे नावलौकिक करण्याच्या संधी आहेत ते करून आपल्या तालुक्याचे नावलौकिक करावे, असेही आमदार प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले.

तालुक्यामध्ये शिक्षणाची गुणवत्ता वाढत आहे. त्यामुळे तालुक्याचे नावलौकिक होताना दिसत असल्याचे ते म्हणाले.

# गुप्तधनासाठी युवकाच्या अंगावरील कपडे काढून गळ्यात बांधली लिंबांची माळ

## सहा जणांविरुद्ध भोकर पोलिसांत गुन्हा दाखल

**भोकर (प्रतिनिधी)–** गुप्त धनासाठी बल्लाळ येथील युवकाचे कपडे काढून लिंबूची माळ घालून जबरीने जादूटोणा व पूजा करण्यास भाग पाडले. या प्रकरणी भोकर पोलिसांत सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ग्रामीण भागात अजूनही अंधश्रद्धा केली जाते. अंगात येणे, जादूटोणा, छाछू करणे असे प्रकार आजही घडत आहेत. भोकर तालुक्यातील बल्लाळ येथील युवकासोबत असाच प्रकार घडला. सिद्धांत शेषराव बाजेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी गंगाधर सुरनुळे, राम गणपत बोमोड, साहेबराव घुमलवाड, बालाजी यमलवाड, मरीबा गाडेकर, लक्ष्मण गाडेकर यांनी संगनमत करून ४ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास



सुरनळे यांच्या शेतात एक खड्डा केला. त्या ठिकाणी लिंबू वगैरे साहित्य वापरून गुप्तधन काढण्याच्या बहाण्याने जादूटोणा करीत फिर्यादीला दमदाटी करून तक्रारदाराचा भाऊ श्रीकांत याचे अंगावरील कपडे काढून गालावर चापटा मारल्या. गळ्यात लिंबाचा हार घालून जागेची पूजा करावयास लावली. या झालेल्या प्रकाराची फिर्याद भोकर पोलीस ठाण्यात देण्यात आल्यानुसार कलम १८९ (२) व कलम ३ (२) नुसार महाराष्ट्र नरबळी जादूटोणा अधिनियम २०१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरेश जाधव करीत आहेत.

# अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा जप्त; पोलिसांची येळी घाटावर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यातील सगरोळी ते नरसी रस्त्यावर अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा गाडीवर बिलोली पोलिसांनी कारवाई करत सुमारे ४० लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच दुसऱ्या कारवाईत उस्माननगर पोलिसांनी लोहा तालुक्यातील येळी येथील गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपसा करणारी २० लाख रुपये किमतीची लोखंडी बोट जिलेटिनच्या साह्याने नष्ट केली.

बिलोली येथील पोलीस अंमलदार निरंजन अंभोरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ६ फेब्रुवारी रोजी मध्यरात्रीनंतर सगरोळी ते नरसी रस्त्यावर पोलिसांनी तपासणी दरम्यान (एमएच ५५ सी ९०००) क्रमांकाची हायवा गाडी अडवली. गाडीत वाळू भरलेली आढळून आली. वाळू वाहतुकीबाबत चालकाने समाधानकारक कागदपत्रे सादर केली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी सुमारे ४० लाख रुपये किमतीची हायवा गाडी व ३५ हजार रुपये किमतीची सात ब्रास वाळू असा एकूण ४० लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



**नांदेड –** श्री क्षत्रिय समाज राजपूत रजि. एफ-११ गाडीपुरा आयोजित ३३ वा सामुहिक विवाह मेळावा वीर महाराणा प्रतापसिंह चौक, स्वर्गीय खुशालसिंह नगर येथे पार पडला. यावेळी श्री.ष.ब्र.प्र.१०८ डॉ. वीरपाक्ष शिवाचार्य महास्वामीजी, सद्गुरू १०९ ष.ब्र.सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज, आ. बालाजी कल्याणकर, ॲड. मिलिंद एकताटे, हरीसिंह काथी, महादेवसिंह गहेरवार, हेमुसिंह निकुंभ, कचरूसिंह अग्निवंशी, बंसीसिंह सगर, मोहनसिंह कौशिक, सालिकरामसिंह परमार, मुन्नासिंह परिहार, शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, नगरसेवक वीरेंद्रसिंघ गाडीवाले, बाळू खोमणे, नगरसेविका अमृता बजरंगसिंह परीहार, रूची भारतीया, प्रियंका संघरत्न कांबळे, महेंद्र देमगुंडे, अमरसिंह चव्हाण, पवनसिंह बैस, श्री क्षत्रिय समाज अध्यक्ष राजेशसिंह अग्निवंशी, सचिव गणेशसिंह कौंडल्य, सहसचिव बजरंगसिंह परीहार, कोषाध्यक्ष रविंद्रसिंह रघुवंशी, सदस्य सरदारसिंह परमार, कालुसिंह कौशिक, हनुमानसिंह गहलोत, कैनुरसिंह निकुंभ, परसरामसिंह विदेह, सुनिलसिंह परमार, उमेशसिंह परमार, विक्रमसिंह काथी आदींची उपस्थिती होती. **(छाया : करणसिंह बैस)**

# महाशिवरात्री निमित्ताने विष्णुपुरी काळेश्वर मंदिर येथे अखंड हरीनाम सप्ताह व शिवलीलामृत पारायण सोहळ्याचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** महाशिवरात्री निमित्ताने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिला मृत पारायण सोहळ्याचे आयोजन ९ ते १६ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले आहे. दैनंदिन विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, १६ फेब्रुवारी रोजी हभप राम महाराज सुगावकर यांच्या काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री क्षेत्र काळेश्वर मंदिर विष्णुपुरी नांदेड येथे दि. सोमवार, दि. ९ ते शनिवार, दि. १६ फेब्रुवारीपर्यंत ह.भ.प. राजेजी महाराज, हनुमान मंदिर पुजारी, विष्णुपुरी यांच्या कृपाशीर्वादाने तसेच ह.भ.प. भाऊसाहेब महाराज पावडेवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व शिवलीलामृत पारायण सोहळा आयोजित केलेला आहे. हभप राम महाराज वडेपुरीकर यांच्या उपस्थितीत व सप्ताह नियोजन उध्दव नामदेव हंबर्डे व काळेश्वर मंदिर पुजारी श्री गणेश महाराज ढणमने यांच्या उपस्थितीत होणार आहे.

सप्ताहानिमित्त दैनंदिन कार्यक्रम सकाळी पहाटे काकडा भजन, सकाळी शिवलीलामृत पारायण, सकळी गाथा भजन, सायं. हरीपाठ व रात्री हरी कीर्तन ह.भ.प. पवन महाराज येस्तारकर, ह.भ.प. चंद्रकांत महाराज लाठकर, ह.भ.प. निवृत्तीनाथ महाराज इसादकर, ह.भ.प. सोपान महाराज पांगरेकर, ह.भ.प. सुधीर महाराज पळशीकर, ह.भ.प. भगवान महाराज शेंद्रकर, ह.भ.प.दशरथ महाराज अंभोरे, ह.भ.प. राम महाराज सुगावकर यांचे काल्याचे दि. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री निमित्त रात्री १२ वाजता अध्यक्ष, काळेश्वर मंदिर संस्थान यांच्या हस्ते श्री काळेश्वर भगवानाचा महाअभिषेक होईल.

तसेच रात्री १२.३० ते पहाटे ५ या वेळेत इतर सर्वांचे टोकन पद्धतीने अभिषेक होतील, संगीत भजन रात्री ११ ते पहाटे ४ पर्यंत होणार असून, या सोहळ्यात भजनी मंडळ मार्कंड, घुमाळवाडी, कौठा, हरबळ, वडेपुरी, जानापुरी, डेरला, निवधा, कल्हाळ, पांगरा, आसदवन, वाघाळा, असर्जन, सिडको, बाभुळगांव, शेलगांव, पावडेवाडी, पळसगांव, झरी, थुगाव व विष्णुपुरी भजनी मंडळ सहभागी होणार आहेत. या सोहळ्याला भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मंदिर विश्वस्त समिती अध्यक्ष माजी खा. भास्करराव पाटील खतगांवकर आणि विश्वस्त समिती व समस्त गावकरी मंडळी, विष्णुपुरी यांनी केले आहे.

# कै. स्वा. सै. आबासाहेब लहानकर यांचे कार्य नवीन पिढीस कळणे गरजेचे -डी. पी. सावंत

**नांदेड (प्रतिनिधी)–** नवीन पिढीला स्वातंत्र्यसैनिकांचे कार्य कळणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री डी. पी. सावंत यांनी केले.

कै. स्वातंत्र्य सेनानी आबासाहेब लहानकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजीनगर येथील त्यांच्या स्मृती स्तंभास अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी पालकमंत्री डी. पी. सावंत यांच्या हस्ते पुष्पांजली वाहण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी माजी आ. अमरनाथ राजूरकर, बाळासाहेब पांडे, स्वा. सै. विठ्ठलराव पवार निवघेकर, गणेशराव बारडकर, मनपा अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, दीपकसिंह रावत, संतोष मुळे, विजय येवनकर, एन. जी. देशमुख, डॉ. सचिन उमरेकर, सुहास लहानकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आबासाहेब कल्याणकर यांनी केले. यावेळी बोलताना माजी पालकमंत्री डी. पी. सावंत म्हणाले, नवीन पिढीला स्वातंत्र्यसैनिकांचे कार्य कळणे गरजेचे आहे. मराठवाडा निजामाच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्यसेनानी आबासाहेब देशमुख लहानकर यांनी भूमिगत राहून प्रत्यक्ष हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यात सहभाग घेतला. याचा इतिहास समाजापुढे मांडणे गरजेचे आहे. यावेळी अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब पांडे यांनी स्वा. सै. आबासाहेब लहानकर यांच्या आठवणी सांगितल्या.



यानंतर स्वा. सै. विठ्ठलराव पवार निवघेकर यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम लढ्यात प्रत्यक्ष सहभाग घेतल्याचे शहारे आणणारे अनुभव सांगितले. यानंतर ॲड. सावित्री जोशी यांनी स्वातंत्र्याची मूल्ये शासन समाज व राजकारणी यांनी जोपासणे गरजेचे आहे, असे सांगितले.

यावेळी पंजाबराव सावंत यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा जिवंत इतिहास श्रोत्यांसमोर मांडून त्यातील कै. आबासाहेब लहानकर यांचे योगदान अधोरेखित केले. या कार्यक्रमास प्रा. एम. यू. धावंडेकर, वसंतराव सर्जे, नगरसेवक किशोर भवरे, बालासाहेब शेवाळकर, नंदकुमार कोसबतवार, अरूणराव लहानकर, बालासाहेब चिकाळेकर, अशोक चौधरी, दुष्यंत सोनाळे, विजय गड्डम, बालासाहेब लहानकर, श्रीराम पिंपळगावकर, बापुराव पा. कोहळीकर, डॉ. विक्रम देशमुख, शिवाजी कल्याणकर, दिलीपराव तरोडेकर, माधव मोरे, गिरीश कल्याणकर, श्रीनिवास मोरे, राजकमलसिंघ गाडीवाले, आदींची उपस्थिती होती.

# ॲडव्हान्स कोचिंग क्रिकेट कॅम्पचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील मराठवाडा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने मुंबई येथील राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे उच्च प्रशिक्षण घेतलेले प्रशिक्षक मयुरेश येळवे यांचे दि. १२ ते १७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आठवडाभराचे प्रशिक्षण कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

या कॅम्पमध्ये १२ वर्षाखालील मुले-मुली ते २३ वर्षाखालील मुले-मुली यांचे नांदेड येथील श्री गुरुगोबिंदसिंगजी स्टेडियम परिसरातील मराठवाडा क्रिकेट अकॅडमी येथे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सर्टिफाइड प्रशिक्षक मयुरेश येळवे यांच्या क्रिकेटविषयक अनुभवाचा जास्तीत जास्त लाभ मराठवाड्यातील खेळाडूंनी घ्यावा, असे आवाहन मराठवाडा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. सदाशिव भुयारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# सत्यजीत बिरादार यांची युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी नियुक्ती



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव तथा महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रभारी अजय चिकाराजी व सहप्रभारी आणि राष्ट्रीय सचिव नवज्योत संधू, सहप्रभारी यांची व राष्ट्रीय सहसचिव शांभवी शुक्ला यांच्या सूचनेनुसार आपल्या कार्यकुशल नेतृत्वगुणांची, संघटनक्षमता व युवक काँग्रेसच्या कार्यातील निष्ठेची दखल घेऊन सत्यजित बिरादार यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

बिरादार यांना दिलेल्या नियुक्तीपत्रात म्हटले आहे की, आपल्या नियुक्तीमुळे संघटनेच्या कार्यात निश्चितच अधिक बळकटी येईल. तसेच पक्षाच्या प्रश्नांवर प्रभावीपणे कार्य करण्यास मदत होईले. पक्षाची धोरणे व कार्यक्रम प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी आपण आपले सर्वोत्तम योगदान द्याल, अशी अपेक्षाही यानिमित्ताने व्यक्त करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे अनेकांनी बिरादार यांचे अनिंदन केले आहे.

# रुग्णसेवा ही ईश्वरसेवा -डॉ. राजेंद्र गोणारकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** रुग्णसेवा ही ईश्वरसेवा आहे. रुग्णांची सेवा केल्यास मनोभावी ईश्वराचीच सेवा केल्याचे समाधान प्राप्त होते, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या माध्यम शास्त्र संकुलाचे माजी संचालक डॉ. प्रा. राजेंद्र गोणारकर यांनी केले.

लॉरेन्स नाईटिंगेल यांनी काही नियम क्राईम इयर युद्ध दरम्यान जखमी सैनिकांची निस्वार्थ सुश्रूषा केली म्हणून त्यांना लेडी विथ कल्याण म्हणून संबोधले जाते. त्यांची आधुनिक नर्सिंगच्या संस्थापक अशीही ओळख आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य केल्यास यशाच्या शिखरापासून कोणीच रोखू शकत नाही, असेही त्यांनी कै. अनंतराव राजूरकर कॉलेज ऑफ नर्सिंग व माऊली नर्सिंग स्कूल यांच्या वार्षिक स्नेह संमेलनात अध्यक्षीय भाषणात सांगितले.



या प्रसंगी व्यासपीठावर प्रा. संतोष देवराये, संस्थेचे अध्यक्ष मनोज मोरे पाटील, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर पाटील शेळके, उषाताई धोंडगे पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रा. रवींद्र सोनकांबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी माऊली नर्सिंग स्कूलच्या प्राचार्य भक्ती नरवाडे, अनंतराव राजूरकर, कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्राचार्य वैष्णवी घुगे, प्रा. स्वप्नील बुद्धेवाड, प्रा. वैष्णवी केंद्रे, प्रा. सतीश गोविंदपुरे, प्रा. अजयकुमार कांबळे, शाहीर गिरीश शेख शफी यांच्यासह महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. तत्पूर्वी कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन डॉ. प्रा. राजेद्र गोणारकर, प्रा. संतोष देवराये यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास अश्विनी दाढे, किरण कुमार, सर्जेराव कांबळे, संगीता इंगोले यांच्यासह शिक्षक, कर्मचारी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुगार अड्ड्यावर धाड; ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** बिलोली शहरातील लोहार गल्ली येथे खेळल्या जात असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांची ७ फेब्रुवारी रोजी धाड टाकली. या धाडीत नगदी २५ हजार ५० रूपये, दोन कार व जुगाराचे साहित्य असा एकूण १७ लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून ७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक कमल शिंदे यांनी केली.

बिलोली शहरातील लोहार गल्ली येथे ७ फेब्रुवारी रोजी इलियास पाशा शेख, सुदाम मिरले, मोहम्मद युनूस मोहम्मद रसूल, मोहम्मद इब्राहिम खान, धनगरी रामलु, खैरान सोहेल नवाबसाब, राकेश गोगरोड व शेख साजिद उर्फ सजुलाल अहमद हे अंदर बाहर नावाचा जुगार खेळत व खेळवित होते.यामध्ये पोलिसांनी नगदी २५ हजार ५० रुपये, दोन कार व जुगाराचे साहित्य असा एकूण १७ लाख २५ हजार ५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून बिलोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com